रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ६४ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ९ ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹




## स्कुटीला अपघात; दोघांचा मृत्यू

**रसायनी:** जुना मुंबई पुणे महामार्गावर कलोते गावच्या हद्दीत एका हॉटेलसमोर मोटारसायकलचा भीषण अपघात झाला असून दोघांचा मृत्यू झाला आहे. महामार्गावरून दोन तरुण स्कुटीने पुणे बाजूला जात असताना कलोते गावच्या हद्दीत एका हॉटेलजवळ स्कुटी झाडावर आदळून भीषण अपघात झाला. यात एकाच जागीच मृत्यू झाला असून, त्याचा मृतदेह खालापूर दवाखान्यात शवविच्छेदनासाठी नेण्यात आला. दुसरा तरुण अतिशय गंभीर होता, त्याला पनवेल येथे एमजीएम हॉस्पिटल येथे तत्काळ दाखल केले असता, त्याचाही मृत्यू झाल्याचे समजते.

# दहीहंडीत भोईरांचे राजकारण

- गोविंदा पथक दिलीप भोईर यांच्यावर नाराज
- सोशल मिडियावर व्यक्त केला निषेध

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

**शिंदे गट शिवसेना पुरस्कृत दहीहंडी स्पर्धा रेवदंडा येथे घेण्यात आल्या होत्या. भैरवनाथ मित्रमंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या दहीहंडी स्पर्धेत कमी वेळेत दहीहंडी फोडण्याचा नियम असताना चिठ्ठी पध्दतीने ही स्पर्धा घेऊन मेटपाडा येथील मरीआई गोविंदा पथकाला डावलण्यात आले. पारंपरिक खेळ असलेल्या दहीहंडी स्पर्धेत दिलीप भोईर यांनी राजकारण केल्याने त्यांच्या या कृत्याचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला जात आहे. सोशल मीडियासह वेगवेगळ्या पध्दतीने दिलीप भोईर यांच्याविरोधात संताप व्यक्त करण्यात आला आहे.**

मेटपाडा मरीआई गोविंदा पथक हे दहीहंडी स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन कमी वेळेत थर उभारणारे पथक म्हणून ओळखले जाते. वेगवेगळ्या जिल्ह्यात या पथकाचा स्पर्धेमध्ये सहभाग असतो. मुंबईत झालेल्या प्रो-गोविंदा दहीहंडी स्पर्धेत सहभाग घेणारे गोविंदा पथक म्हणून मेटपाडा मरीआई गोविंदा पथकाची ओळख आहे. रेवदंड्यामध्ये गुरुवारी भैरवनाथ मित्रमंडळाच्यावतीने दहीहंडी स्पर्धा आयोजित केली होती. पान २ वर

कमी वेळेत सहा थर उभारण्याचा नियम सुरुवातीला लागू केला होता. परंतु मरीआई गोविंदा पथक हा थर उभारण्यात यशस्वी ठरेल, अशी भीती दिलीप भोईर यांना निर्माण झाली होती. त्यामुळे त्यांनी कमी वेळेऐवजी चिठ्ठी उडवून सोडत पध्दतीने थर उभारण्याचा नियम अचानक सुरु केला. दिलीप भोईर यांनी राजकारण करून केलेल्या या प्रकाराबाबत गोविंदा पथकांनी तीव्र संताप निर्माण झाला.

### शिस्तबद्ध नियोजन शेकापकडून शिकावे

"रेवदंडा येथील श्री भैरवनाथ मित्रमंडळाच्यावतीने शिवसेना पुरस्कृत दहीहंडी सराव शिबिराचे आयोजन अन्यायकारक आहे. कमी वेळात थर लावतील, त्यांना एक ते पाच क्रमांक दिले जातील. हा नियम सर्व गोविंदा पथकांसमोर जाहीर करण्यात आला होता. परंतु आयत्यावेळी आयोजकांनी हा नियम बदलून चिठ्ठी सोडत पद्धतीचा नियम गोविंदा पथकावर लादला. रक्ताचे पाणी करून दोन ते तीन महिने सराव करण्यात आला. नियमांची पायमल्ली करीत त्यांना हीनतेची वागणूक देण्यात आली. अलिबागमध्ये आयोजन, नियोजन, पूर्णपणे शिस्तबध्द असते. हे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्याकडून शिकावे. त्या हंडीला मानाची हंडी म्हणून बोलले जाते. काल रेवदंडा येथे झालेल्या दहीहंडी सराव शिबिराच्या आयोजकाकडून गोविंदा पथकावर अन्याय झाला आहे. त्याबद्दल जाहीर निषेध व्यक्त करण्यात येत आहे"

– सुनील पाटील, गोविंदाप्रेमी




### पैशासाठी नव्हे नावासाठी सहभाग

ही स्पर्धा पैशासाठी नसून नावासाठी खेळत असल्याचे दिलीप भोईर यांना पथकातील सदस्यांनी उघडपणे सांगितले. यावेळी मेटपाडा गोविंदा पथकाला हीनतेची वागणूक दिल्याचा आरोप करण्यात आला. त्यानंतर झिराड येथील दहीहंडी स्पर्धेत मेटपाडा गोविंदा पथकाने सहभागी होऊ नये, असे जाहीरपणे दिलीप भोईर यांनी सांगितले. त्यांच्या या वागणुकीमुळे गोविंदा पथकाकडून संताप व्यक्त करण्यात आला आहे. तसेच दिलीप भोईर यांच्या या मनमानी कारभाराबाबत गोविंदा पथकाने नाराजी व्यक्त केली असून सोशल मीडियाचा आधार घेत दिलीप भोईर यांच्याविरोधात निषेध व्यक्त केला.

## वेधक

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**महाड :** महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात एक धक्कादायक घटनेची नोंद झाली आहे. ७५ वर्षीय वृद्धाने अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे. पीडित मुलगी आपल्या शिक्षिकेच्या घरी शिकवणीसाठी जात होती. आरोपी, त्या शिक्षिकेचेच वडील आहेत. त्याने तिला चॉकलेट आणि फुलांचे आमिष दाखवून २८ जुलै ते ६ ऑगस्ट या कालावधीत तिचा विनयभंग केला. पीडितेने या कृत्याचा विरोध केला आणि शिक्षिकेला सांगण्याची धमकी दिल्यावर आरोपीने तिला सोडून दिले. पोलिसांनी तातडीने जगन्नाथ सुखदेव सूर्यवंशी याला ताब्यात घेतले असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### ट्रेलरची धडक; चालकाचा मृत्यू

**पनवेल :** मुंब्रा महामार्गावरील कळंबोली पोलीस ठाण्याशेजारील सेवा रस्त्यावर कळंबोली गावातील शर्मा बेकरीशेजारी राहणारा अनिकेत जाधव हा कामावर बीमा कॉम्प्लेक्स येथे स्कुटीवरून जात असताना मागून आलेल्या ट्रेलरने अनिकेतच्या स्कुटीला धडक दिली. रस्त्यावर कोसळलेल्या अनिकेतच्या अंगावरून ट्रेलरचे चाक गेल्याने अनिकेतचा जागीच मृत्यू झाला. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात २३ वर्षीय ट्रेलरचालक शिवप्रकाश वर्मा याच्यावर हलगर्जीपणाने ट्रेलर चालविल्यामुळे गुन्हा नोंद करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती शेळके या अधिक तपास करीत आहेत.

### अपघातात एकाचा मृत्यु,चौघे जखमी

**कोलाड :** रोहा तालुक्यातील पुगांव ते ऐनवहाळ या मार्गांवर ट्रक पलटी होऊन अपघात झाला. यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला तर चौघेजण जखमी झाले. मिळालेल्या माहितीनूसार, ट्रक क्रमांक एम. एच.४२ ए.क्यू.१६२५ वरील वाहन चालक पुगांव ते ऐनवहाळ या मार्गाने वाहन घेऊन जात होता. ऐनवहाळ गावाच्या हद्दीत आले असता रस्ता वळणाचा चालकाचा गाडीवरील ताबा सुटला व ट्रक पलटी झाला. या अपघातात जितु उर्फ मोदी प्रेमजीत मखवाना याच्या अंगावर ट्रकमधील रेतीच्या गोणी पडल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला तर संतोष कोकाटे, प्रफुल्ल मगर, ज्ञानेश्वर साळवी, संजय चोरगे हे चौघेजण जखमी झाले.

# जिल्ह्यात नारळी पौर्णिमेचा जल्लोष

## कोळी समाजाने समुद्राला अर्पण केला नारळ

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने जिल्ह्यात पारंपरिक वेशभूषा करीत मिरवणूक काढण्यात आली. बेंजो, ढोलताशांच्या तालावर आणि गाण्यांच्या ठेक्यावर नाचत नारळी पौर्णिमेचा सण शुक्रवारी (दि.८) जल्लोषात साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील असंख्य कोळी बांधव व महिलांनी एकत्र येत समुद्रकिनारी पुजा करून सायंकाळी सोन्याचा मुलामा असलेला नारळ समुद्राला अर्पण केला. समुद्राला शांत होण्याबरोबरच मासळी भरपूर मिळावी, असे आवाहन केले.

नारळी पौर्णिमा हा कोळी समाजाचा अतिशय महत्वाचा सण मानला जातो. या दिवशी विधीवत पूजा करून समुद्राला सोन्याचा नारळ अर्पण करून मासेमारीला सुरुवात केली जाते. रायगड जिल्ह्यात अलिबागसह पान २ वर


(छायाचित्र : समीर मालोदे)


(छायाचित्र : सुधीर नाझरे)

# ११ ऑगस्टपासून शिक्षकांचे उपोषण

## जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांचा निर्णय

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयातील (शेवा) शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ११ ऑगस्ट २०२५ पासून उपोषणाचा पवित्रा घेतला आहे. गेल्या सात वर्षांपासून सुरू असलेल्या आर्थिक छळाला आणि मानसिक त्रासाला कंटाळून त्यांनी येत्या ११ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नव्याने कार्यभार स्वीकारलेल्या रुस्तमजी केरावाला फाउंडेशन संस्थेने त्यांच्यावर चालविलेला अन्याय आता चव्हाट्यावर आला आहे.

कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, रुस्तमजी केरावाला फाउंडेशनने सातवा वेतन आयोग तर लागू केला नाहीच, पण त्यासोबतच सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे मिळणारी वार्षिक वेतनवाढ आणि महागाई भत्ता जुलै २०१९ पासून दिलेला नाही. गेल्या सात वर्षांपासून ही थकीत रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याची आर्थिक कुचंबणा झाली आहे आणि त्यांची मानसिकता ढासळली आहे. वारंवार शालेय समितीमध्ये विषय काढूनही संस्थेच्या प्रशासनाने याकडे सोयीस्करपणे डोळेझाक केली आहे.

या निवेदनाची एक प्रत अनेक राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना पाठवण्यात आली आहे, जेणेकरून या गंभीर समस्येवर तातडीने पान २ वर

### अंतिम निर्णय, प्रशासनाला इशारा

**आता कर्मचाऱ्यांनी अत्यंत कठोर निर्णय घेतला आहे. जोपर्यंत सात वर्षांची थकीत रक्कम फरकासह त्यांच्या बँक खात्यात जमा होत नाही, तोपर्यंत ते जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालय, शेवा, येथील माध्यमिक इमारतीच्या गेटसमोर शांततेच्या मार्गाने आमरण उपोषण करतील. त्यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, जर ११ ऑगस्टपूर्वी थकीत रक्कम मिळाली नाही आणि या उपोषणादरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल.**

## शेतकरी कामगार पक्षातर्फे

# तहसील कार्यालयावर मोर्चा

- तत्कालीन मंडळ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी




**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

कासारभट येथील शेतकऱ्याला न्याय मिळत नसल्याने शेतकरी कामगार पक्षातर्फे शुक्रवारी (दि.८) अपर तहसील कार्यालयावर माजी आ. बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे आयोजन केले होते. यावेळी तत्कालीन तलाठी आणि तत्कालीन मंडळ अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा आणि शेतकऱ्याचा सातबारा जिवंत करण्यात यावा, अशा मागण्या करण्यात आल्या.

बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि शेकापचे रायगड जिल्हा शेतकरी सभेचे जिल्हाध्यक्ष अनिल ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली कासारभट येथील भोंडकर परिवारातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. साई येथील १०८ गुंठे जमीन तत्कालीन तलाठी व तत्कालीन मंडळ अधिकारी यांनी बनावट कागदपत्रे बनवून व बनावट सावकार उभे करून जमीन हडप केल्याचा या दोघांवर आरोप आहे. भोंडकर या शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या तत्कालीन तलाठी व मंडळाधिकारी यांच्यावर गुन्हा पान २ वर

# आक्षीला उधाणाचा धोका

## जिल्हाधिकारी कार्यालयात बंधाऱ्याचा प्रस्ताव धुळखात




**| अलिबाग | प्रतिनिधी |**

समुद्रकिनारी वसलेल्या आक्षी, साखर गावांना उधाणाचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरी सुरक्षेच्या दृष्टीने धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यात यावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून शासनाकडे करण्यात आली आहे. मात्र जिल्हा प्रशासनाकडून याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. परिणामी, आपत्कालीन परिस्थितीत या गावांना पुराचा धोका उद्‌भवण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने याबाबत दखल घेतली नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले जाईल, असा इशारा सरपंच रश्मी पाटील यांनी दिला आहे.

अलिबाग तालुक्यातील आक्षी हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे गाव आहे. अलिबाग शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर समुद्रकिनारी हे गाव वसले आहे. आक्षीमध्ये पर्यटकांची वर्दळ कायमच असते. शनिवार व रविवारी सुट्टीच्या दिवशी व अन्य सुट्टीच्या हंगामात लाखोच्या संख्येने पर्यटक आक्षीला पसंती दर्शवितात. आक्षीमध्ये अनेक हॉटेल, कॉटेजेस आहेत. याशिवाय मासेमारी करणारा वर्गदेखील आक्षी, साखरमध्ये मोठ्या प्रमाणात आहे. यातून कुटुंबाचा पान २ वर

**"वारंवार शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. बंधारा बांधला नाही, तर समुद्रातील पाणी गावात शिरून पुरपरिस्थिती निर्माण होण्याची भीती आहे. नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. सतत उधाणाबरोबरच लाटांच्या माऱ्यामुळे किनाऱ्याची धूप होऊ लागली आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे."**

**– रश्मी पाटील– सरपंच, आक्षी**

वन्यजीवांचे आक्रमण, हवामान बदलाचा परिणाम | सर्वसामान्यांच्या खिशाला बसली कात्री

# श्रीफळाचे दर वाढले, उत्पादन घटले

**| रायगड | प्रतिनिधी |**

सणासुदीचे दिवस सुरू झाल्याने जेवणाची चव वाढवणारे श्रीफळ अर्थात नारळ महागले असल्याने खिशाला कात्री बसत आहे. सध्या नारळाचे दर सुमारे ५० ते ६० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. या दरवाढीचे मुख्य कारण म्हणजे हवामानातील बदल आणि वन्यप्राण्यांचा वाढलेला उपद्रव, ज्यामुळे नारळाचे उत्पादन घटले आहे. बागायतदारांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा नारळाच्या उत्पादनात ७० टक्क्यांची घट झाली असून, केवळ ३० टक्केच उत्पादन मिळत आहे.



सण-उत्सवांसाठी नारळाची मोठी मागणी असते. गणेश चतुर्थी, पितृपक्ष, दिवाळी तसेच लग्नसोहळे अशा विविध सणांमध्ये नारळाला मोठी मागणी असते. काही वर्षांपूर्वी नारळाला फारशी किंमत मिळत नसल्यामुळे अनेक बागायतदार नारळाऐवजी काजू, सुपारी, पोफळी आणि केळीच्या बागांकडे वळले होते. परंतु आता नारळाला चांगला भाव मिळत आहे. मात्र, मागणीनुसार पुरवठा करणे बागायतदारांना शक्य होत नाही. माकडांचा हैदोस बागायतदारांसाठी डोकेदुखी ठरत आहे. हे प्राणी नारळाच्या झाडांवरील फळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करत आहेत. त्यामुळे निसर्गाचा लहरीपणा आणि वन्यप्राण्यांचा त्रास यामुळे बागायतदार चिंतेत आहेत. दरवर्षी तीन ते चार वेळा उत्पादन घेणारे बागायतदार गेल्या वर्षापासून जेमतेम ३० टक्केच उत्पादन मिळवत आहेत. वर्षभर देखभाल, साफसफाई, औषधे आणि पान २ वर

### केरळ आणि कारवारची आवक थांबली

**पूर्वी केरळ आणि कारवार परिसरांतून मोठ्या प्रमाणात नारळ विक्रीसाठी येत होते. परंतु, आता त्या ठिकाणी नारळावर आधारित प्रक्रिया उद्योग सुरू झाल्याने, नारळाची उपलब्धता कमी झाली आहे. व्हर्जिन ऑइल काढणे आणि इतर प्रक्रिया उद्योगांमुळे त्या परिसरातील नारळ स्थानिक बाजारात विक्रीसाठी येत नाहीत, असे रायगडातील नारळ विक्रेते प्रसाद गायकवाड यांनी सांगितले.**

**"नारळाचे दर वाढले असले तरी, मागणी कमी झालेली नाही. नारळ जेवणाची चव वाढवतो, त्यामुळे ग्राहक ते विकत घेतातच. परंतु उत्पादन कमी झाल्यामुळे मागणीनुसार पुरवठा करणे शक्य होत नाही. हवामानातील बदल आणि माकडांच्या त्रासामुळे उत्पादनावर परिणाम झाल्याचे उत्पादक शेतकरी सांगतात. या सर्व कारणांमुळे सणासुदीच्या काळात नारळाच्या दरात मोठी वाढ झाली आहे. लहान नारळाचा दर २० ते २५ रुपयांपासून सुरू होतो, तर सर्वात मोठ्या नारळासाठी ५० ते ६० रुपये मोजावे लागतात."**

**– प्रशांत दळवी**

### आईनेच केली बाळाची विक्री

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

गोवंडीच्या शिवाजीनगर परिसरात सहा दिवसांच्या बाळाची विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे बाळाच्या आईनेच तिच्या मुलाची साडेपाच लाखांना विक्री केली. पोलिसांना या प्रकरणाची माहिती मिळताच बाळाची सुखरूप सुटका केली असून आईसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एका सामाजिक कार्यकर्त्याला गोवंडी येथील शिवाजीनगर परिसरात लहान मुलांची बेकायदा खरेदी-विक्री केली जात असल्याची माहिती मिळाली होती. त्याने तातडीने ही माहिती एका समाजसेवा पान २ वर

# डॉ. मनीषा विखेंना यश

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे यांना यश आले आहे. त्यांना याच पदावर ठेवण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. त्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून डॉ. मनीषा विखे याचे काम पाहणार आहेत.

डॉ. मनीषा विखे यांची ठाणे येथील जिल्हा क्षयरोग अधिकारी म्हणून बदली करण्यात आली होती. या प्रशासकीय बदली विरोधात डॉ. मनीषा विखे यांनी मॅटमध्ये दाद मागितली होती. त्यावर मॅटने बदलीला स्थगिती दिल्यानंतर डॉ. विखे पुन्हा जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून रायगड जिल्हा परिषदमध्ये हजर झाल्या होत्या. परंतु जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी डॉ. दयानंद सुर्यवंशी यांची नियुक्ती डॉ. विखे यांच्या जागेवर अगोदर केली होती. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून डॉ. विखे न्यायासाठी लढा देत होत्या. एकाच पदावर दोन अधिकारी अशी परिस्थिती निर्माण झाली होती. अखेर डॉ. मनिषा विखे यांना यश मिळाले आहे. डॉ. मनीषा विखे यांची ठाणे येथील जिल्हा क्षयरोग अधिकारी या पदावर बदलीने केलेल्या पदस्थापनेचे आदेश आणि डॉ. दयानंद सुर्यवंशी यांच्या जिल्हा आरोग्य अधिकारी पदावर बदलीने केलेल्या पदस्थापनेचे आदेश शासनाने रद्द केले आहेत. डॉ. मनीषा विखे यांची जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणूनच बदलीचे लेखी आदेश शासनाने ६ ऑगस्ट रोजी काढले आहेत. त्यामुळे डॉ. विखे या पुन्हा जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणूनच कामकाज पाहणार आहेत.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ ऑगस्ट

१) श्री.प्रमोद जनार्दन पाटील
वरसोली, अलिबाग,
०९-०८-१९५६

२)श्रीम.सपना विलास कंदाडे
मु.ब्राम्हणआळी, अलिबाग
०९-०८-१९५६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**पांडुरंग वामन तांबोळी, रेवस गाव, अलिबाग**



**गजानन शंकर केसकर, स्मरणार्थ अलिबाग**

## श्री ज्ञानेश्वरी बोध



भगवान श्री ज्ञानदेवांना ज्ञानाची मिरासदारी कोण्या विशिष्ट वर्गाकडे ठेवायची नव्हती. नरदेहाचे सार्थक कशात आहे.हे सर्व प्राकृत लोकांना समजावे सर्वांच्या कल्याणाचा मार्ग मोकळा व्हावा ही अखिल मानव विषयी त्यांना कळकळ होती म्हणून मराठी भाषेत ग्रंथरचना आणि ती देखील त्यावेळच्या लोकभाषेत करावी म्हणजे ब्रह्मविद्येचा सुकाळ होईल असे त्यांना वाटले होते. कर्मकांडांच्या चौकटीत अडकून पडलेल्या गुदमरलेल्या समाजाला स्वःताचे ज्ञान देऊन अनंत अवकाशात आणून सोडायचे होते. त्यांना निराशेच्या गर्तेतून मुक्त व निर्मळ जीवनाच्या दालनात आणायचे होते. भक्तीचा राजसिंहासनावर मंडित करायचे होते

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी,**
**पेण.**

# पान १ वरून

## दहीहंडी भोईरांचे राजकारण

शिंदे गट शिवसेना पुरस्कृत ही स्पर्धा होती. पाच थरांची सराव स्पर्धा झाल्यानंतर सहा थरांची स्पर्धा घेण्यात आली. सुरुवातीच्या पाच थरांची दहीहंडी कमी वेळेत उभारण्यात मरीआई गोविंदा पथकाने आघाडी मारली होती. त्यामुळे सहा थरांची दहीहंडी फोडण्यासाठी त्या पथकाला संधी देणे गरजेचे होते. परंतु त्याठिकाणी असलेले शिंदे गटातील दिलीप भोईर यांनी या खेळामध्ये राजकारण केल्याची चर्चा आहे.

## ११ ऑगस्टपासून शिक्षकांचे उपोषण

लक्ष दिले जावे. कर्मचाऱ्यांनी आता आपली सर्व आशा सोडून न्यायासाठी थेट आंदोलनाचा मार्ग अवलंबला असून, त्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत हा लढा सुरूच राहील, असे दिसते.

**कागदावरच हस्तांतरण, प्रश्न प्रलंबितच**

शासकीय नियमांनुसार शाळेचे हस्तांतरण होऊन जवळजवळ तीन वर्षांचा काळ लोटला आहे. तरीही कर्मचाऱ्यांच्या मागण्या कागदावरच राहिलेल्या आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार पत्रव्यवहार करूनही त्याची योग्य प्रकारे दखल घेण्यात आली नाही, असे कर्मचाऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे. यामुळे गेली सहा वर्षे केलेल्या पाठपुराव्यानंतरही सर्व प्रश्न प्रलंबितच राहिले आहेत. या अन्यायामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

## आक्षीला उधाणाचा धोका

उदरनिर्वाह चालविला जातो. एक ऐतिहासिक भूमी म्हणून आक्षीकडे पाहिले जाते. रायगड जिल्ह्यातील आक्षी गावात मराठी भाषेतील सर्वाच प्राचीन शिलालेख सापडला आहे. आक्षीला सुंदर असा समुद्रकिनारा लाभला आहे. आक्षीतील पर्यटनाला पर्यटक अधिक पसंती देतात. त्यामुळे आक्षीमध्ये दर आठवड्याला साधारणतः पाचशेहून अधिक पर्यटक भेट देतात असल्याची माहिती समोर येत आहे. वर्षाला दोन लाखाहून अधिक पर्यटक आक्षीमध्ये फिरण्यासाठी येतात. आक्षी गावासह साखर, रायवाडी परिसरात तीन हजारहून अधिक नागरिक राहतात. परंतु याच नागरिकांच्या सुरक्षेबाबत प्रशासन उदासीन असल्याचे समोर आले आहे. आक्षी समुद्रकिनाऱ्यावरील साखर व रायवाडी समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात लाटांचा मारा बसत आहे. या उधाणामुळे येथील किनाऱ्याची धूप होत आहे. किनाऱ्यावरील गावांना भविष्यात उधाणाचा धोका निर्माण होण्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे. धूप प्रतिबंधक बंधारा उभारण्यासाठी शासनाकडे गेल्या पाच वर्षापासून मागणी केली जात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात या मागणीचा प्रस्ताव धुळखात आहे. त्याची अद्यापही प्रशासनाकडून दखल घेण्यात आली नाही. जिल्हा प्रशासनासह शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनेकवेळा पत्र देऊन पुन्हा धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याची मागणी करण्यात आली आहे.

आक्षीच्या समुद्रकिनाऱ्याची उधाणामुळे धूप होत आहे. सातत्याने पाच वर्षे जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. मात्र त्याबाबत दखल घेण्यात आली नाही. किनाऱ्यावरील झाडांची समुद्रातील पाण्याने धुप होत आहे. गावांच्या सुरक्षेच्या प्रश्न निर्माण झाला आहे. तीस ते चाळीस फुट जमिनीची धूप होऊन झाडांची नासधूस झाली आहे. जिल्हा प्रशासनाने धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याचा विचार करावा, असे,आक्षी उपसरपंच आनंद बुरांडे यांनी सांगितले.

## आईनेच केली बाळाची विक्री

करणाऱ्या एका दाम्पत्याला दिली. त्यानंतर आरोपींना रंगेहाथ अटक करण्यासाठी कट रचत समीर शेख या व्यक्तीला फोन करत लहान मूल हवे असल्याचे सांगितले. यानंतर समीर शेखने मुलगी हवी असल्यास चार लाख आणि मुलासाठी साडेपाच लाख रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. त्यावर समाजसेवा करणाऱ्याने मुलगा किंवा मुलगी कोणीही चालेल, असे सांगितल्यावर समीरने सहा दिवसांचे बाळ असल्याची माहिती दिली. बाळाची माहिती मिळताच याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी शिवाजीनगर पोलिसांना कळवले. त्यानंतर कट रचल्याप्रमाणे बुधवारी, ६ ऑगस्ट रोजी सामाजिक कार्यकर्ते आणि पोलीस ठरलेल्या ठिकाणी दाखल झाले. तसेच नाझिमा अस्लम आणि फातिमा शेख या दोघी त्या ठिकाणी बाळ घेऊन आल्या. त्याचवेळी पोलीस पथकाने त्यांना ताब्यात घेतले. तसेच त्यांच्याकडे काही कागदपत्रे आढळली असून त्यानुसार बाळाची जन्मतारीख १ ऑगस्ट आहे आणि त्यावर सुमय्या खान ही मुलाची आई म्हणून नोंद असल्याचे दिसून आले.

दरम्यान पोलिसांनी अटक केल्यानंतर सुमय्या हिनेच समीर शेख याला बाळ विक्रीस दिल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी बाळाची सुटका करत पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. यामधील नाझिमा अस्लम हिच्यावर या आधीही बाळ विक्री केल्याप्रकरणी गोवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचे चौकशीतून समोर आले आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## जिल्ह्यात नारळी पौर्णिमेचा जल्लोष

अनेक भागात हा सण उत्साहात पार पडला. सकाळपासून कोळीवाड्यांमध्ये एक वेगळा उत्साह दिसून आला. अनेक ठिकाणी नारळ फोडीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. समुद्राला नैवेद्य देण्यासाठी महिलांनी नवनवीन पदार्थ तयार केले. सायंकाळी चारनंतर अलिबाग कोळीवाड्यासह आक्षी, नागाव, रेवस, मांडवा, मुरूड, श्रीवर्धन अशा अनेक कोळीवाड्यामधून मिरवणूक काढण्यात आली. कोळी गीतांच्या तालावर नाचत ही मिरवणूक समुद्रकिनाऱ्यांपर्यंत नेण्यात आली. या मिरवणुकीसोबत डोक्यांवर कळश, पारंपरिक वेशभुषा करीत कोळी समाज सहभागी झाले होते. तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक असे सर्वच मंडळी या मिरवणुकीमध्ये सहभागी झाले. समुद्राकिनारी मिरवणूक आल्यावर सर्वांनी समुद्राची विधीवत पूजा केली. कळशातील पाणी व सोन्याचा मुलामा असलेले नारळ समुद्राला अर्पण केले.

## तहसील कार्यालयावर मोर्चा

दाखल करण्यात यावा तसेच सातबाऱ्यावर पुन्हा भोंडकर कुटुंबियांची नावे लागण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी अपर तहसीलदार यांनी याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवण्यात आला असल्याचे सांगितले. यावेळी सभापती नारायण घरत, पालिका जिल्हा चिटणीस प्रकाश म्हात्रे, तालुका चिटणीस पनवेल विधानसभा व माजी जिल्हा परिषद सदस्य विलास फडके, तालुका चिटणीस राजेश केणी, काँग्रेस पालिका जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, महापालिका महिला जिल्हाध्यक्ष हर्षला तांबोळी, शेकाप सहचिटणीस तेजस्विनी घरत, पुरोगामी जिल्हाध्यक्ष देवेंद्र पाटील आणि अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

## श्रीफळाचे दर वाढले, उत्पादन घटले

खतांवर होणारा खर्च आणि मिळणारे उत्पादन यांचा ताळमेळ बसत नसल्याने बागायतदारांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे.

**उत्पादन घटण्याची कारणे**

नारळ उत्पादन घटण्यामागे अनेक कारणे आहेत. कोकणात कल्पवृक्ष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नारळाच्या बागांची लागवड तशी कमी आहे. त्यातच, हवामान बदलामुळे उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. यंदा फळधारणा होत असताना उष्णता वाढल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच, पावसाच्या वेळापत्रकात झालेला बदलही यासाठी कारणीभूत ठरला आहे.

**गृहिणींची दमछाक**

नारळ महागले असल्याने घर चालविणाऱ्या गृहिणींची दमछाक होत आहे. महिन्यांचे घर खर्चाचे अंदाजपत्रक वाढले आहे. सणासुदीचे दिवस सुरू झाल्याने देव कार्यासाठी देखील नारळ हमखास लागतो. त्यामुळे भक्तांना तो खरेदी करताना चिंता असते. तरीही घर आणि देशासाठी नारळ खरेदी करताना ग्राहक हात आखडता घेत नाहीत. त्यामुळे नारळाचे भाव चांगलेच वाढले आहेत.

## तटकरेंच्या बालेकिल्ल्यात शिवसेनेचा थर

**| चणेरा | सत्यप्रसाद आडाव |**

राज्यात राजकीय वातावरण तापलेलं असताना निवडणुका तोंडावर आहेत. अशातच महायुतीचे खा. सुनील तटकरे व आ.महेंद्र दळवी यांनी आपापसातच स्पर्धा करायला सुरुवात केली आहे. आमदारांनी तटकरेंच्या बालेकिल्ल्यात दहिहंडीचे आयोजन करीत त्यांना चिथविण्याचा प्रयत्न केला आहे.

पालकमंत्री पदाच्या निवडीवरुन राष्ट्रवादीचे खा. तटकरे व शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांमधील वाद संपूर्ण महाराष्ट्राला माहित आहे. तटकरेंचा बालेकिल्ला असलेल्या रोह्यात शिंदे गटाचे आ. दळवींनी दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले आहे. जिल्ह्याच्या राजकारणात सणांपेक्षा राष्ट्रवादी पक्ष व शिंदे गटाचे राजकारण जास्त रंगू लागले आहे. यंदाच्या रोहा शहरातील दहीहंडी उत्सवाला राजकीय वळण मिळालं असून, शिवसेना शिंदे गटाचे आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार तटकरे यांच्यातील न बोललेली रस्सीखेच लोकांच्या चर्चेचा विषय ठरली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून खा. तटकरे यांनी रायगड जिल्ह्यात संगठित राजकीय डाव टाकण्यास सुरुवात केली आहे. महाडमधून शिंदे गटाचे बलाढ्य नेते राजीव साबळे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश करून घेतला, तोही थेट आ. भरत गोगावले यांच्या मतदारसंघात. अलिबागमध्ये काँग्रेसचे नेते प्रविण ठाकूर यांना राष्ट्रवादीत सामील करून घेतलं तर कर्जतमध्ये आ. महेंद्र थोरवे यांचे कट्टर प्रतिस्पर्धी सुधाकर घारे यांना थेट जिल्हाध्यक्ष पदाची धुरा दिली. तसेच महाडमध्ये स्नेहल जगताप यांचा प्रवेशही राष्ट्रवादीत यापुर्वीच घेण्यात आला आहे. दळवी हे थेट तटकरे यांना आव्हान देत नसले, तरी राजकीय थर उभारून सत्तेचा इशारा देत आहेत, अशी कुजबुज ऐकू येते. बालेकिल्ल्यात थेट शिरकाव कराल तर, तुमच्या बालेकिल्ल्यात आम्ही गोविंदा उभा करू, असा सूचक संदेश या माध्यमातून देण्यात आला असल्याचं जाणकारांचं म्हणणं आहे.

**जाहिरात**

ओम साई प्रेरणा CMRC अलिबाग अंतर्गत नव तेजस्विनी प्रोफेशनल लेडीज सलोन (ब्युटीपार्लर) करिता मार्केटिंग एक्झिक्युटीव्ह चे पद करार तत्वावर भरावयाचे आहे. तरी खालील पात्रताधारक उमेदवारांनी संस्थेच्या अध्यक्षांचे नावाने दिनांक २५/८/२०२५ पर्यंत अर्ज करावेत.

| पद | पदसंख्या | शिक्षण | वय | अनुभव | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | पदवीधर | २१ ते ४० | १ वर्ष मार्केटिंग | रोहा |

अर्ज करण्यासाठी पत्ता-
अध्यक्ष
ई-मेल-cmrcomsaiprerna@gmail.com
मोबाईल क्रमांक- १) ८३०८२२००८८ २) ८८३०७६०८२२

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे - वारे ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र. चौ. मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| रामदास मधुकर म्हसे | १४५ | ६ | ६-१६-०० यापैकी ३-०८-०० | २=९६ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.
हे सर्वास कळावे.

ठिकाण :- नेरळ
दिनांक :- ९/८/२०२५

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं.१०१ नेरळ
ता. कर्जत जि. रायगड
मो. नं - ९८८१२७९८१७

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे - वारे ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र. चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| अंजना मधुकर म्हसे | १४५ | ६ | ६-१६-०० यापैकी ३-०८-०० | २=९६ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.
हे सर्वास कळावे.

ठिकाण :- नेरळ
दिनांक :- ९/८/२०२५

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं- १०१ नेरळ
ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९८८१२७९८१७

दिनांक: ०८/०८/२०२५

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे झुंगरेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र.हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| २७ | एकूण क्षेत्र ०-७९-०० हे. आर. | ०.२८ |
| २१/५/ब | एकूण क्षेत्र ०-८५-०० हे. आर | ०.६९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ४ (चार) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०८/०८/२०२५ **ॲड. रोहित रो. मानकवळे**
ठिकाण : पनवेल पत्ता : शॉप नं. २३, प्लॉट नं. ५१, कल्पतरू कॉम्प्लेक्स सेक्टर ०९ खांदा कॉलनी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६

## अलिबाग नगरपरिषद

### जाहीर नोटीस

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधाने अलिबाग नगरपरिषद प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह अलिबाग नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

**अलिबाग नगरपरिषद/जाहीर नोटीस जा.क्र. /२०२५ दि.**

| अ. क्र. | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप वर्णन/ब्लॉक/ गाळा वगैरे | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याची नावे | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १२७०/०५०७२ | मारूती नाका, अलिबाग | तिसरा मजला, सदनिका क्र.ए-३०१ | अक्षय बिल्डर्स तर्फे प्रशांत मधुसूदन नाईक व संजय ज्ञानदेव चव्हाण तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी किशोर अनंत पाटील | महेश योगेंद्र नार्वेकर |
| २ | २ | १४८३/०४०९१ | स्टेट बँकेजवळ अलिबाग | दुसरा मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र.२०३ | चित्रा राजीव टिळक व राजीव नरहर टिळक | शितल अशोक धुमाळ |
| ३ | २ | ५५१अ/०४९१७ | चेंढरे, अलिबाग | पहिला मजला, सदनिका क्र.१०२ | मे.दिपीका कंन्स्ट्रक्शन तर्फे प्रोप्रा. संतोष दामोदर मोरे | शामला शशिकांत नाईक |
| ४ | २ | १७८७/०२११२ | रामनाथ रोड,अलिबाग | सदनिका क्र.१ | प्रदिप कृष्णाकांत गोरागांधी | रणजित सिंग बिंद्रा |
| ५ | २ | १६१९अ/६/०४६०१ | ब्राम्हण आळी, अलिबाग | तळमजला, ए विंग शॉप क्र.०६ | मे सावित्री कंन्स्ट्रक्शन तर्फे मुकेश बी जैन तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी सुभाष जैन | आशिष शशिकांत म्हात्रे व अभिजित शशिकांत म्हात्रे |
| ६ | २ | २/००९३३ | श्रीबाग १, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२ | देवाशिस रॉय | अबीद जकरिया उलडे व तबस्सुम अबीद उलडे |
| ७ | २ | ५५१/अ/०५१७४ | चेंढरे,अलिबाग | चौथा मजला, निवासी सदनिका क्र.४०१ | मे दिपीका कंन्स्ट्रक्शन तर्फे प्रोप्रा संतोष दामोदर मोरे | जयवंत नथुराम कांबळी व नम्रता जयवंत कांबळी |
| ८ | २ | ५५१/अ/०५१७४ | चेंढरे, अलिबाग | चौथा मजला, निवासी सदनिका क्र.४०२ | मे दिपीका कंन्स्ट्रक्शन तर्फे प्रोप्रा संतोष दामोदर मोरे | सचिन कृष्णा शिंदे व स्वाती सचिन शिंदे |
| ९ | २ | ३३/२७/०४१७६ | भाजीमार्केट जवळ, अलिबाग | दुसरा मजला, सदनिका क्र.२११ | सुमन विजय सावंत व श्यामल विजय सावंत | फैसल सलीम अफराद |
| १० | २ | १४०९C विंग/ ०१६६८ | जुन्या नगरपरिषदे जवळ, अलिबाग | दुसरा मजला, सी विंग निवासी सदनिका क्र. सी ३०२ | सुनील जगन्नाथ डोळस वगैरे ४ | योगेश गणेश लिमये |
| ११ | २ | ८२२/१/०१११० | चावडी मोहल्ला, अलिबाग | सदनिका क्र.१०२ | सय्यदहुसेन अब्दुल वहाब कादरी | महमदसईद आब्बास पंचुलकर व नसरीन व म सईद पंचूलकर |
| १२ | २ | ५५१/अ/०४९१९ | चेंढरे, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.१०२ | मे दिपीका कंन्स्ट्रक्शन तर्फे प्रोप्रा. संतोष दामोदर मोरे | माधुरी किशोर बांगर |
| १३ | २ | /०५०५१ | एस टी स्टॅण्डजवळ अलिबाग | तळ मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र. जी-१ | इरशाद अहमद अब्दुल लतीफ सैय्यद वगैरे २ | जावेद अली |
| १४ | २ | १२७०/०५०७२ | मारूती नाक्याजवळ अलिबाग | चौथा मजला, निवासी सदनिका क्र.ए/४०६ | अक्षय बिल्डर्स तर्फे प्रशांत मधुसूदन नाईक व संजय ज्ञानदेव चव्हाण तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी अमित अरविंद पाटील | नयन अजय पाटील |
| १५ | २ | १२७०/०५०७२ | मारूतीनाक्याजवळ अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र.ए/३०५ | अक्षय बिल्डर्स तर्फे प्रशांत मधुसूदन नाईक व संजय ज्ञानदेव चव्हाण तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी अमित अरविंद पाटील | महेश यशवंत पाटील व सोनम महेश पाटील |
| १६ | २ | १४६०/०५०५२ | जोगळेकर नाका, अलिबाग | तळमजला, शॉप क्र.१५ | जोग इन्फ्रास्ट्रक्चर्स तर्फे प्रोप्रायटर प्रसाद अनंत जोग | फारूक सत्तार मेमन व शकुर सत्तार मेमन |
| १७ | २ | १७८९/०२११४ | रामनाथ रोड,अलिबाग | सदनिका क्र.१ | प्रदिप कृष्णाकांत गोरागांधी | रणजित सिंग बिंद्रा |
| १८ | २ | १७८८/०२११३ | रामनाथ रोड,अलिबाग | सदनिका क्र.२ | प्रदिप कृष्णाकांत गोरागांधी | रणजित सिंग बिंद्रा |
| १९ | २ | १४३०/०५०५२ | जोगेळकर नाका, अलिबाग | तळमजला, शॉप क्र.१५ | जोग इन्फ्रास्ट्रक्चर्स तर्फे प्रोप्रायटर प्रसाद अनंत जोग | असलाम फारूक दरवेश |
| २० | २ | १५९५/०५१५१ | रामनाथ ब्राम्हणआळी, अलिबाग | तिसरा मजला, फ्लॅट क्र.३०२ | मे ए कॉर्प तर्फे पार्टनर हार्दिक पिनाकिन अजमेरा | संजय सिताराम घरत व सानिया संजय घरत |
| २१ | २ | १५९५/०५१५१ | रामनाथ ब्राम्हणआळी, अलिबाग | सहावा मजला फ्लॅट क्र. ६०२ | मे ए कॉर्प तर्फे पार्टनर हार्दिक पिनाकिन अजमेरो | पुनित रविंद्र पाटील |
| २२ | २ | ६४६/ब/०५१०० | चेंढरे,अलिबाग | उंचावलेला तिसरा मजला, निवासी सदनिका क्र.४०६ | शार्दुल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार प्रशांत दिनकरराव फुलगांवकर व कविता प्रशांत फुलगांवकर | स्मिता सुशांत राऊत |
| २३ | २ | १०७३Aविंग/ ०४९९८ | मारूतीनाक्याजवळ अलिबाग | तिसरा मजला, फ्लॅट क्र. ए/३०६ | प्रशांत मधुसूदन नाईक तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी धनंजय अनंत दळवी | मन्सूर हिदायत कूर |
| २४ | २ | १२३७ब/०१५०६ | मारूतीनाक्याजवळ अलिबाग | दुसरा मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र. २०३ | सुरेखा नागेश वाघ | अभिराज चंद्रकांत पाटील |
| २५ | २ | १५८७/अ/०१८९३ | ब्राम्हणआळी,रामनाथ रोड, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०१(०९) | उमेश सुरेश पाटील वगैरे २ | करिश्मा मयूर भगत व मयूर मनोहर भगत |
| २६ | २ | १६४८/Bविंग/ ०१९७० | ब्राम्हणआळी, अलिबाग | पहिला मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र.१०१ | गोवर्धन सदाशिव कोळी | अशोककुमार हरिश्चंद्र मोदनवाला |
| २७ | २ | २/००००08 | जुन्या मार्केट जवळ, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०२ | राजीव मनोहर भगत | राजेश कृष्णा म्हात्रे व नितु राजेश म्हात्रे |
| २८ | २ | २०३२/०२५०७ | रायवाडी चेंढरे, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०३ | मनेश मनोहर पाटील | सतिश काशिनाथ म्हात्रे |
| २९ | २ | ६४६ब/०५०९९ | चेंढरे,अलिबाग | पहिला मजला, बी विंग निवासी गाळा क्र.२०२ | शार्दुल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार प्रशांत दिनकरराव फुलगांवकर व कविता कविता प्रशांत फुलगांवकर | वैभव गोपीनाथ पाटील व मनिषा वैभव पाटील |
| ३० | २ | १६१२/C विंग/ ०१९८५ | जिल्हा न्यायालया जवळ, अलिबाग | पहिला मजला,सी विंग, निवासी सदनिका क्र.१(५) | महानंदा महादेव पेरेकर | गणेश महादेव पेरेकर |
| ३१ | ३ | ४२६/००५१५ | ठिकरूळ नाक्याजवळ अलिबाग | तळमजला, दुकानी गाळा क्र.०६ | शंशाक विनायक भोईर च्या तर्फे दस्तऐवज प्रवेशासाठी कु.मु.रागिणी विनायक भोईर | आसावरी अनिल शितकर |
| ३२ | २ | १९४९अ/१/ ०२३४४ | रामनाथ रोड, अलिबाग | तळमजला, दुकान गाळा क्र.७ | परशुराम गणपत म्हात्रे | राजेंद्र लक्ष्मण पालकर |
| ३३ | २ | १६२२/Aविंग | ब्राम्हणआळी, अलिबाग | पहिला मजला, ए विंग | उदय विष्णू साठे | आनंद नारायण पटवर्धन |

**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

## निवडक



### राज्यमार्गावरील अतिक्रमणांना नोटीसा

**नेरळ :** कर्जत कल्याण राज्यमार्ग ७६ वर रस्त्याच्या शासकीय जागेत अतिक्रमण करून बांधलेल्या बांधकामांना सार्वजनिक बांधकाम विभागाने नोटीस दिल्या आहेत. अतिक्रमणे हटवण्याची मोहीम बांधकाम खाते हाती घेणार असून डोणे फाटा ते नेरळ मिनी ट्रेन ट्रॅक या दरम्यान असलेल्या १०० हून अधिक अतिक्रमणे यांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. दरम्यान, ही सर्व अतिक्रमणे संबंधितांकडून तात्काळ काढण्यात यावीत असे आदेश देण्यात आले असून नोटीस मिळाल्यापासून पुढील तीन दिवसानंतर कारवाई करणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम खात्याने जाहीर केले आहे. राज्यमार्ग ७६ वर शासनाच्या नियमाप्रमाणे रस्त्याच्या मध्यभागापासून ३७ मीटर एवढी इमारत बांधकाम रेषा आहे. तर साधारण रस्त्यापासून १३ मीटरपर्यंत कोणतेही बांधकाम असू नये असे धोरण आहे. कोणत्याही वाहनांना अपघात झाल्यानंतर रस्त्याच्या आजूबाजूला अतिक्रमणे असल्यास जीवितहानी होण्याची शक्यता असते. ते लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम खात्याने आपल्या मालकीच्या शासकीय जागेत अतिक्रमण करणाऱ्या सर्व अतिक्रमणधारकांना अतिकरणे हटविण्याच्या नोटीसा बजावल्या आहेत. या रस्त्यावर कर्जत तालुका हद्दीत असलेल्या डोणे फाटा ते नेरळ मिनी ट्रेन ट्रॅक नेरळ पेट्रोल सर्व्हिस या दरम्यान असलेल्या सर्व अतिक्रमणे हलविण्यात यावीत अशी नोटीस सार्वजनिक बांधकाम विभागाने काढली आहे. या रस्त्यावर नेरळ गावातील रस्ता दोन पदरी नसल्याने रस्ता अरुंद आहे आणि त्यात रस्त्याच्याकडेला अतिक्रमणे झाल्याने वाहनांना अडचणी निर्माण होतात.हे लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्काळ हालचाली करून नेरळ परिसरातील १०० हून अधिक अतिक्रमणे यांना नोटीसा बजावल्या आहेत. कर्जत- कल्याण राज्य मार्ग हा सार्वजनिक बांधकाम विभागाचे उरण उप विभाग यांच्या अखत्यारीत येत असून त्यांच्या मार्फत नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.




### श्रीवर्धन आगाराला समस्याचे ग्रहण

**श्रीवर्धन :** एकेकाळी रायगड विभागात एक नंबरचे उत्पन्न मिळवणारे श्रीवर्धन आगार असे श्रीवर्धन परिवहन आगाराची ख्याती होती. परंतु मागील तीन-चार वर्षांपासून श्रीवर्धन आगाराला समस्यांचे ग्रहणच लागल्याचे पाहायला मिळत आहे. अनेक वर्ष जुन्या झालेल्या बस गाड्या श्रीवर्धन आगारात आहेत. अनेक वेळा प्रवासादरम्यान गाड्यांच्या चाकांचे नटबोल्ट निघणे, गाडीचे चाक निखळणे, गाडीचे इंजिन ओव्हर हिट होणे, टायर पंक्चर होणे या समस्या नित्याच्याच झाल्या आहेत. याव्यतिरिक्त श्रीवर्धन आगारातून ज्या वेळापत्रका नुसार बस सुटणार असते, त्या वेळापत्रकानुसार केव्हाच बस सुटत नाहीत. कायम अर्धा तास, एक तास उशिरानेच बस सेवा सुरू असतात. चार महिन्यांपूर्वी श्रीवर्धन बस आगारात पाच नवीन बस गाड्यांचा ताफा दाखल झाला. परंतु या बसेस फक्त बीड, लातूर, सातारा या मार्गावरती चालवल्या जातात. मुंबई, ठाणे, भाईंदर, नालासोपारा,बोरीवली, कल्याण या मार्गावरती नेहमीच भंगार व खटारा बसेस पाठवल्या जातात. परिवहन मंडळाकडून नको असलेल्या गोष्टींसाठी विनाकारण खर्च होत असल्याचे पाहायला मिळते. श्रीवर्धन बस स्थानकामधील आसनांवर असलेल्या लाद्या, त्याचप्रमाणे खालील फ्लोअर वरच्या लाद्या ह्या सुस्थितीत असताना सुद्धा त्या काढून त्या ठिकाणी नवीन लाद्या लावण्याचे काम हातात घेण्यात आले होते. महामंडळाने असा फालतू खर्च करण्यापेक्षा आगारात नवीन बसेस पुराव्यात. अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### तरूणाची आत्महत्या

**रसायनी :** चांभार्ली गावामध्ये तरूणीनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दिपक कुमार इश्वरदीप यादव वय २०, रा. सुधीर मुंढे यांची चाळ, रूम नं. २, चांभार्ली, मुळ गाव रा. बसिया, जि. गौरवस्ती, रा. बिहार याने अज्ञात कारणावरून राहत्या रूममधील छताच्या लोखंडी पाईपला गळफास घेऊन आत्महत्या केली. काही दिवसापासून मयत दिपक हा विनाकारण बडबड करीत असल्याचे शेजारील साक्षीदार यांनी सांगितले आहे. याबाबत त्यांच्या रिंकी यादव यांनी रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली असून रसायनी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली मपोना पाटील अधिक तपास करीत आहेत.

# युरिया खताचा प्रश्‍न सुटणार

| प्रमोद जाधव |
| अलिबाग |

रायगड जिल्ह्यामध्ये भात लावणीची कामे पुर्ण झाली आहेत. मात्र, भाताच्या रोपांच्या वाढीसाठी खत उपलब्ध होत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले होते. आता मात्र युरिया खताचा प्रश्न सुटणार आहे. एक ते सात ऑगस्ट या सात दिवसाच्या कालावधीत ७९० मेट्रीक टन खताचा पुरवठा जिल्ह्यात आरसीएफ कंपनीकडुन करण्यात आला आहे. उर्वरित युरिया खताचा देखील यापुढे जिल्ह्यात नियमितपणे पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्रामध्ये खतांचा पुरवठा केला असल्याचे सांगण्यात आले आहे.




जिल्ह्यामध्ये ८६ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये भात लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. परंतु यंदा पावसामुळे पेरणी करण्यास अडचणी निर्माण झाल्या. त्यात अधिक पाऊस पडल्याने काही भाताची रोपे कुजून गेली. लागवडीसाठी रोपे उपलब्ध नसल्याने अनेक शेत जमीन ओसाड गेली.

जिल्ह्यात भात हे पीक प्रामुख्याने घेतले जाते. सद्यस्थितीत भाताची लागवड पूर्ण होत आली आहे. भातपिक वाढीच्या अवस्थेत आहे. मागील काही दिवसात पेण, अलिबाग, उरण व पनवेल या तालुक्यांमध्ये युरिया खताच्या टंचाईची समस्या निर्माण झाली होती. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या मनात चिंता निर्माण झाली होती. भाताची रोपे वाढीसाठी युरिया खताची गरज भासली होती. खतासाठी वणवण निर्माण झाली होती. परंतु आता खतासाठी चिंता करण्याची काही गरज नसल्याचे कृषी विभागाने सांगितले आहे.

जिल्ह्यात एक एप्रिल ते ३० सप्टेंबर या खरीप हंगामासाठी ११ हजार ९३१ मेट्रिक टन युरिया खत मंजूर आहे. १ एप्रिल पासून आतापर्यंत एकूण ९१५० मेट्रीक टन युरिया व बफर स्टॉकमधील ६९८ मेट्रीक टन असा एकूण ९ हजार ८४८ मेट्रीक युरिया खताचा पुरवठा जिल्ह्यात झाला आहे. त्यापैकी एक ते सात ऑगस्ट या सात दिवसाच्या कालावधीत ७९० मेट्रीक टन खताचा पुरवठा जिल्ह्यात आरसीएफ कंपनीकडून करण्यात आला आहे. उर्वरित युरिया खताचा देखील यापुढे जिल्ह्यात नियमितपणे पुरवठा करण्यात येणार असल्याचे कृषी विभागाने सांगितले आहे.

#### नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई

**विक्री केंद्रावर सर्व उत्पादने व त्यांची अधिकृत किंमती स्पष्टपणे फलकावर दर्शवाव्यात. शेतकऱ्यांना पक्के बिल देणे अनिवार्य आहे. दररोजचा खरेदी-विक्रीसाठा नोंदवहीत नियमित लिहावा.फक्त अधिकृत कंपन्यांचे, सरकारमान्य उत्पादनेच विक्रीसाठी ठेवावीत.नकली किंवा कालबाह्य उत्पादने विक्रीस ठेवू नयेत. खताची विक्री इ-पॉस मशीनद्वारेच करावी हे सर्व सूचनांचे कृषी केंद्र धारकांनी पालन करणे गरजेचे आहे नियमांचे उल्लंघन केल्यास नियमा प्रमाणे उचित कार्यवाही, तसेच कारवाई करण्यात येईल, अशी सुचना कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.**

> **जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्रामध्ये खताचा पुरवठा करण्यात आला आहे. जिल्ह्यात दोनशेहून अधिक खत विक्रीची दुकाने आहेत. शेतकऱ्यांनी फक्त अधिकृत कृषी केंद्र धारकांकडूनच खत खरेदी करावे.घेतलेल्या खताचे पक्के बिल अथवा पावती कृषी केंद्र धारकांकडून घ्यावे.काही गैरप्रकार आढळल्यास संबंधित तालुका कृषी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात संपर्क साधून तक्रार नोंदवावा.**
>
> **- वंदना शिंदे**
> **जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

### रक्षाबंधनाला देशभक्तीची जोड

| कर्जत | प्रतिनिधी |

माजी सैनिक ट्रस्ट, डिकसळ यांच्यावतीने संचालित डॅफोडिल्स स्कूलमध्ये शुक्रवार (दि.८) ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाचा उत्सव देशभक्तीच्या साक्षीने साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थिनींनी माजी सैनिक व पोलीस कर्मचाऱ्यांच्या मनगटावर राखी बांधत, त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाला माजी सैनिक, पोलीस अधिकारी तसेच शाळेतील शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. त्यानंतर विद्यार्थिनींनी राखी बांधून देशासाठी योगदान देणाऱ्या वीरांना आदरांजली वाहिली. यावेळी कार्यक्रम ठिकाणी सुभेदार विनायक उपाध्ये, सुभेदार डी. एफ. निंबाळकर, नायक आबा गोपाळ बांदेकर, सार्जंट विनायक गोखले, चीफ पीटी ऑफिसर तानाजी पाटील, सब लेफ्टनंट शंकर सिंह, आर. के. पांडे, श्रीकांत चव्हाण यांच्यासह पोलीस विभागातील प्रविण पाटील अंकुश काकडे आणि महादेव कोरे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# वीज मीटर तपासणीचे मशीनच नादुरुस्त

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात असलेल्या वीज ग्राहकांचे वीज मीटर नादुरुस्त झाल्यानंतर ते मीटर दुरुस्त करणारे मशीन नादुरुस्त आहेत.मीटर तपासण्याची यंत्रणा कर्जत महावितरण कार्यालयात उपलब्ध नसल्याने वीज मीटर तपासणी करण्यासाठी कर्जत तालुक्यातील ग्राहकांना पनवेल येथे जाण्याच्या सूचना कर्जत कार्यालयातून दिल्या जात आहेत.



तालुक्यातील कर्जत येथे महावितरणचे कार्यालयात येणारे वीज ग्राहक यांना वीज समस्यांनी त्रस्त केळे आहे.ऑफिसम वीज ग्राहकांना त्रास होत आहे. अनेक वीज ग्राहकांचे वीज मीटर फॉल्टी असल्याने ते प्रत्येक ग्राहक आपले वीज मीटर यांची तपासणी करून घेण्यासाठी कर्जत कार्यालयात पोहचतात. मात्र कर्जत कार्यालयात वीज मीटर तपासणी करण्यासाठी असलेले मीटर नादुरुस्त आहेत.त्याचा परिणाम वीज मीटर तपासणी करण्यासाठी पनवेल येथे पाठवले जात आहे.

गेली अनेक दिवस होऊन देखील मीटर टेस्टिंग नसल्यामुळे ग्राहकांना हा पनवेल फेरा त्रासदायक ठरत आहे.

मीटर तपासले जात नसल्यामुळे ग्राहकांच्या अनेक तक्रारी येत आहेत,त्यात घरगुती मीटर साठी पाचशे ते सहाशे युनिट पडत आहेत. जिथे घरगुती वापरासाठी ८० ते १०० पडतात तिथे आता पाचशे ते सहाशे युनिट पडत आहेत आणि असे मीटर चेक करण्यासाठी ग्राहक घेऊन जात असतात. परंतु तेथे मीटर चेक करण्यासाठी मशीन खराब असल्याचे सांगितले जाते व त्या ग्राहकांना मीटर चेक करण्यासाठी पनवेल येथे पाठवले जात आहे. चई, खांडस, पाषाणे, पिंपळोली, सालपे, अश्या खेड्यातून पूर्ण दिवस प्रवास करून येणाऱ्या ग्राहकांना मीटर टेस्टिंग साठी पनवेल येथे पाठवले जात असल्याचे निर्दशनात आले आहे.

#### ग्राहकांच्या त्रासाला जबाबदार कोण?

**यावर महावितरणाकडून सांगितले आहे की मीटर चेक करण्यासाठी लागणारे मशीन याची व्हॅलेडिटी संपली आहे. वेळोवेळी मागणी करून देखील आम्हाला मीटर चेक करण्याची मशीन मिळत नाही अशी तक्रार देखील वरिष्ठांकडे केली आहे. त्यामुळे पनवेल येथे मीटर चेक करण्यासाठी ग्राहकांना पाठवले जात आहेत.**

### आदिवासी दिनानिमित्त विविध कार्यक्रम

| अलिबाग | प्रतिनिधी |

जागतिक आदीवासी दिन व क्रांती दिन रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने अलिबागमध्ये शनिवार (दि.९) सकाळपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिन कमिटी अलिबाग व मुरूड तालुक्याच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती जी. जी मेंगाळ आणि सुरेश नाईक यांनी दिली.

जिल्ह्यामध्ये दरवर्षी जागतीक आदिवासी दिन साजरा केला जातो. आदीवासी समाजाच्या हक्काचे आणि संरक्षण आणि जागरुकता वाढविण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या निमित्ताने शनिवारी अलिबागमध्ये मिरवणूक काढण्यात येणार आहे. सकाळी दहा वाजता मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. रायगड बाजार येथून मिरवणुकाला सुरुवात होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक, बालाजी नाका, महावीर चौक, एसटी स्थानक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते शेतकरी भवन अशी ही रॅली कुरुळ येथील क्षात्रैक्य सभागृहपर्यंत जाणार आहे. त्यानंतर शिधापत्रिका, शासनाच्या योजनाची माहिती वेगवेगळे दाखले वाटपाचा कार्यक्रम या सभागृहात होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, आदिवासी प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे, उपवनसंरक्षक राहूल पाटील, अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील, दाजी दाईंगडे, हर्षल देशमुख सुरेश नाईक, जी.जी. मेंगाळ उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.



### गहाळ मोबाईल मुळ मालकांस परत

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गहाळ झालेले व चोरी झालेल्या मोबाईल फोनचा शोध रसायनी पोलिसांनी आलेल्या तक्रारीवरून घेतला असून प्रॉपर्टी मिसिंगमधील मोबाईल फोनचा सीईआयआर पोर्टलचा वापर करून फोन शोधून काढण्यास रसायनी पोलिसांना यश मिळाले आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी खालापूर यांच्या मार्गदर्शनाखाली व रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या अथक प्रयत्नाने रसायनी परिसरातील चोरीस व गहाळ झालेले १६ मोबाईल फोन मोबाईल धारकांना पोलीस ठाण्यात बोलावून व खातरजमा करून त्यांना परत करण्यात आले. याबद्दल मोबाईल धारकांनी रसायनी पोलीस ठाण्याचे आभार मानले.

### ‘सण उत्सव शांततेत साजरा करा’

| कोलाड | प्रतिनिधी |

आगामी येणारे सर्व सण उत्सव पारंपारीक पद्धतीने उत्साहात व शांततेत साजरा करावे. तसेच प्रत्येक नागरिकांनी दक्षता घ्यावी असे आवाहन कोलाड पोलीस ठाण्याचे सपोनि नितीन मोहिते यांनी केले आहे. आगामी होऊ घातलेले जन्माष्टमी, गणेशोत्सव व अन्य विविध या सणांच्या निमित्ताने कोलाड पोलीस ठाण्यात गुरुवार (दि. ७) सपोनि नितीन मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस ठाण्यात शांतता कमिटी सदस्यांची सभा पार पडली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या सभेत गोपनीय विभागाचे पोलीस नितीन गायकवाड,शिद नरेश पाटील, पोलीस पाटील, समाज सेवक, सर्व पक्ष कार्यकर्त्यांच्या सूचना ऐकून त्यांच्या सूचनांचे निरसन करण्यात आले.

# जिल्ह्यात पोलिसांचे शक्ती प्रदर्शन

**● भयमुक्त वातावरणात सण, उत्सव साजरे करण्यासाठी प्रयत्न**

| अलिबाग | प्रतिनिधी |

जिल्ह्यात गोपाळकाळासह गणेशोत्सव सण काही दिवसांवर येऊन ठेपले आहेत. या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नयेत. तसेच सण, उत्सव भयमुक्त वातावरणात साजरे करता यावेत, म्हणून रायगड पोलिसांनी जिल्ह्यात पोलीस संचलन करण्यात आले. जिल्हयातील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावे, वाड्यांमध्ये जाऊन पोलीसांतर्फे संचलन करण्यात आले. श्रीकृष्ण जन्माष्टमीनंतर दुसऱ्या दिवशी शनिवारी (दि.१६) ऑगस्ट रोजी गोपाळकाला सण आहे.



या दिवशी जिल्ह्यामध्ये सुमारे आठ हजारहून अधिक दहीहंडी उभारण्यात येणार आहेत. तसेच बुधवार (दि. २७) ऑगस्टपासून गणरायाचे आगमन घरोघरी होणार आहे. घरगुती बरोबरच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळामार्फत हजारो गणेशमुर्तीची प्रतिष्ठापना होणार आहे. दहा दिवस धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. मंगलमय व आनंदमय वातावरण हा उत्सव साजरा केला जाणार आहे. परंतु, काही समाज कंटक व अतिउत्साही व्यक्तींमुळे सण, उत्सवांवर गालबोट लागण्याची भिती अधिक असते. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचा धोका असतो. हा धोका निर्माण होऊ नये, म्हणून रायगड पोलिसांमार्फत जिल्ह्यात ठिकठिकाणी पोलीस संचलन करुन शक्ती प्रदर्शन सुरू केले आहे.




**हरिहरेश्वर तीर्थक्षेत्र प्रदक्षिणा मार्गावर अनेक दुर्घटना** | **सावधानता बाळगण्याचे आवाहन**

# पर्यटकांचे सूचना फलकाकडे दुर्लक्ष

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

**दक्षिण काशी म्हणून श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर महाराष्ट्रात ओळखले जाते. हे ठिकाण भगवान शंकराच्या मंदिरासाठी तसेच समुद्र किनाऱ्यासाठी प्रसिद्ध आहे् भाविक हरिहरेश्वर येथे श्रध्देने येतात, तर पर्यटक सुट्टीच्या दिवसात हजेरी लावतात. मुख्यत्वे उत्तरक्रिया, पिंडदान विधी हे हरिहरेश्वर येथे केले जातात. या कारणास्तव येथील समुद्र किनारा तसेच प्रामुख्याने तीर्थक्षेत्र प्रदक्षिणा मार्गावर भाविक, पर्यटकांची कायम वर्दळ असते.**



तीर्थक्षेत्र प्रदक्षिणा मार्गावरील खडकांवर अनेकदा उसळणाऱ्या लाटांसोबत फोटो, सेल्फी घेण्याच्या मोहात अद्यापपर्यंत पर्यटकांना आपला जीव गमावला आहे तर काही पर्यटक नशीब बलवत्तर म्हणून बचावले आहेत. हरिहरेश्वर येथील समुद्रात पोहताना भरती व ओहोटी चा अंदाज न आल्यामुळे लाटांच्या तडाख्यात पर्यटक पडल्याच्या घटना घडत आहेत. अनेकदा प्रदक्षिणा मार्गावर किंवा समुद्रात पोहायला जाणारा पर्यटक हा स्थानिकांनी केलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करताना आढळतो.

हरिहरेश्वर ग्रामपंचायत वतीने तीर्थक्षेत्र प्रदक्षिणा मार्गावरील धोकादायक ठिकाणे व समुद्र किनाऱ्यावर पर्यटक, भाविकांसाठी सूचना फलक उभे करीत सावधानता बाळगण्याचे आवाहन केले आहे. दुर्दैवाने एखादा प्रसंग उद्भवल्यास आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधण्यासाठी हरिहरेश्वर ग्रामपंचायत, श्रीवर्धन पोलीस ठाणे, स्थानिक पोलीस पाटील व रेस्क्यू टीमच्या सभासदांचे भ्रमणध्वनी क्रमांक फलकावर टाकण्यात आले आहेत.

हरिहरेश्वर ग्रामपंचायत मार्फत तीर्थक्षेत्र प्रदक्षिणा मार्गावर पर्यटकांसाठी सूचना फलक उभे करून सुद्धा अतिउत्साही पर्यटक त्या फलकाकडे तसेच स्थानिक देत असलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास येते. पावसाने प्रदक्षिणा मार्गावरील खडक निसरडे झाले आहेत. त्यातच, पावसाळी दिवसात येणारे उधाण, भरती ओहोटीचा अंदाज न घेता फेसाळणाऱ्या लाटा खडकावर उसळणाऱ्या लाटा सोबत सेल्फी, फोटो घेण्यात मग्न होत आहेत. तीर्थक्षेत्र प्रदक्षिणा मार्गावर मागील तीन वर्षांत फोटो घेण्याच्या नादात किंवा लाटांचा अंदाज न आल्याने साधारण पणे ५ ते ६ व्यक्ती लाटांच्या तडाख्यात सापडल्यामुळे मृत्यूमुखी पडल्याच्या घटना घडल्या आहेत.

> **पावसाळी दिवसात भरती ओहोटी व उधाण संदर्भात मंदिराचे येथे सूचना फलक लावण्यात येतो व ध्वनीक्षेपका वरून देखील सूचना करण्यात येतात. परंतु, उत्साही पर्यटक त्याकडे दुर्लक्ष करून अतिरेक करतात.**
>
> **- सिद्धेश पोवार**
> **सचिव/खजिनदार श्री देव हरिहरेश्वर**

## हे घ्या पुरावे, आता बोला..

राहुल गांधी यांनी निवडणुकांमधील भ्रष्टाचाराचा जबरदस्त पर्दाफाश केला आहे. आजवर ज्या गोष्टींबाबत केवळ संशय व्यक्त केला जात होता त्यांचा जबरदस्त पुरावाच त्यांनी गुरुवारी दिल्लीत सादर केला. निवडणूक आयोगाने हा पुरावा झटकून टाकण्याचा प्रयत्न केला तर लोकांचा लोकशाही आणि निवडणुकांवरचा विश्‍वासच उडून जाईल. भाजपच्या दबावाखाली येऊन आयोगाने राहुल यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला तर ती भारतातील लोकशाहीच्या शेवटाची सुरुवात असेल. राहुल यांनी आकडेवारी व नावनिशीवार जाहीरपणे पुरावे सादर केले आहेत. त्यांची दखल घेऊन आयोगाने स्वतःहून या प्रकरणांची चौकशी करायला हवी. आयोग ते करणार नसेल तर सर्वोच्च न्यायालयाने ते करायला हवे. राहुल यांना परवाच सर्वोच्च न्यायालयाने सच्चे भारतीय असाल तर सरकारवर टीका करू नका असा अनाठायी व चुकीचा सल्ला दिला होता. त्याचे परिमार्जन म्हणून आता न्यायालयाने आयोगाला या प्रकरणाची चौकशी करण्यास भाग पाडायला हवे. राहुल गेले अनेक दिवस आपल्यापाशी एटम बाँब असल्याचे म्हणत होते. तो काल अखेर त्यांनी फोडला. यापूर्वी एकाएकी मतदारांची संख्या कशी वाढली किंवा एटीएममध्ये काहीतरी घोळ आहे असे काँग्रेस व विरोधकांचे आक्षेप होते. पण आता राहुल यांनी मध्य बंगलोर लोकसभा मतदारसंघात येणार्‍या महादेवपुरा या विधानसभा मतदारसंघामध्ये तब्बल एक लाख बोगस मतदार असल्याचे दाखवून दिले. याच ठिकाणच्या मताधिक्यामुळे ही लोकसभेची जागा भाजपने जिंकली असे दिसते. या बोगस मतदारांमध्ये, पत्ते खोटे वा बनावट आहेत असे चाळीस हजार, दोन किंवा अधिक ठिकाणी मतदान असलेले बारा हजार, फोटो नसलेले चार हजार मतदार आहेत. याखेरीज तब्बल ३३ हजार ६९२ मतदार फॉर्म सहा भरून पहिल्यांदाच मतदार झाले. त्यांची वये खरे तर अठरा ते वीसच्या दरम्यान असायला हवीत. पण प्रत्यक्षात यातील सर्वांची वये ७० ते ९० च्या दरम्यानची आहेत. भाजपचा उमेदवार या मतदारसंघात ३२ हजार मतांनी जिंकला तो याच बोगस मतांच्या आधारे असे राहुल यांनी दाखवून दिले.

### आयोगाकडून अडवणूक

पण हा भ्रष्टाचार उघडकीस आणणे सोपे काम नव्हते. कारण, निवडणूक आयोग पदोपदी अडवणूक करीत होता. मतदारांचा हा तपशील डिजिटल स्वरुपात द्यावा असे काँग्रेसचे म्हणणे होते. तसे झाले असते तर एका पेन ड्राईव्हवर हा सर्व डेटा मावला असता. तो एखाद्या संगणकात टाकला असता की त्यातील दोन-दोनदा येणारी नावे, चुकीचे पत्ते, वडिलांचे नाव अस्पष्ट असणे असे तपशील काही तासांमध्ये शोधून काढता आले असते. उदाहरणार्थ गुरुकिरतसिंग डांग नावाच्या एका मतदाराचे नाव त्याच मतदारसंघात चार बूथवर आढळून आले. किंवा शकुन राणी नावाच्या ७० वर्षांच्या एका महिलेने नवीन मतदार म्हणून दोनदा अर्ज केलेला व तो मान्य झालेला दिसला. हे सर्व तपशील संगणकात असते तर काही मिनिटांमध्ये उघड झाले असते. पण निवडणूक आयोगाने काँग्रेसला कागदावर छापलेल्या मतदारयाद्या दिल्या. दुसरे म्हणजे त्यातील फोटो व माहिती अशा रीतीने छापलेली होती की ती स्कॅन करता येणे अशक्य होते. त्यामुळे ही माहिती आधी संगणकात टाईप करून नंतर तिचे विश्‍लेषण करण्यास चाळीस माणसांच्या टीमला सहा महिने लागले. निवडणूक आयोगाने जाणीवपूर्वक हे सर्व केले असेच म्हणायला हवे. आजच्या डिजिटल इंडियाच्या युगात लहान गावातले लोकदेखील संगणकाचा वापर करतात. अशा वेळी निवडणूक आयोगाने मतदारयाद्या डिजिटल स्वरुपात न पुरवणे हे संशयास्पद आहे. मतदारयाद्यांमध्ये केलेला भ्रष्टाचार सहजपणे शोधून काढता येऊ नये यासाठीच हे केले गेले असावे अशा शंकेला त्यामुळे जागा निर्माण होते. निवडणूक आयोगाने राहुल यांचे हे आरोप निराधार आहेत असे एका वाक्याचे उत्तर दिले आहे. शिवाय, राहुल यांनी ही माहिती खरी आहे असे लेखी प्रतिज्ञापत्र भरून द्यावे, तरच त्यांच्या तक्रारीची दखल घेता येऊ शकेल असे म्हटले आहे. थोडक्यात आयोग निव्वळ तकलादू नियमांचा आधार घेऊन त्याच्या आड लपू पाहत आहे.

### चोराच्या मनात चांदणे

यांनी केलेले आरोप हे पाच-पन्नास नावांपुरते वा एखाद्या बूथपुरते मर्यादित नाहीत. एक लाख बोगस मतदानाचा आरोप ते करीत आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीचाच हवाला त्यांनी दिला आहे. भारतीय लोकशाहीतील निवडणुकांचे पावित्र्य, सच्चेपणा व प्रामाणिकपणा हाच वादाच्या वा शंकेच्या भोवर्‍यात उभा राहिला आहे. शिवाय, हा सर्व भ्रष्टाचार कोणाचे तरी दुर्लक्ष वा नजरचुकीने झालेला नाही. भाजपने निवडणूक आयोगाच्या मदतीने हा भ्रष्टाचार केला आहे असे राहुल यांचे म्हणणे आहे. अशा वेळी आयोगाने स्वतःहून पुढे होऊन त्यांची चौकशी करणे वा राहुल चुकीचे असतील तर तसे दाखवून देणे ही आयोगाची जबाबदारी आहे. त्याऐवजी निवडणूक आयुक्त त्यांना अमुक फॉर्म भरा असे ट्विटरवरच्या संदेशातून सांगत आहेत. राहुल यांची टर उडवण्याचा वा त्यांना पप्पू ठरवण्याचा हा प्रकार आहे. राहुल यांची अशी कुचेष्टा केल्याने आज कदाचित भाजपवाले खूष होतील. निवडणूक आयोगाच्या अधिकार्‍यांना पुढच्या आयुष्यात त्याचा फायदा होईल. पण यामुळे सामान्य जनतेचा निवडणूक यंत्रणेवरचा विश्‍वास मात्र कायमचा उडेल. कारण, हजारो खोटी नावे, पत्ते इत्यादी मतदारयादीत सहज घुसवता येत असतील तर आपल्या मतदानाला किंमत काय राहिली असेच प्रत्येकाला वाटल्याखेरीज राहणार नाही. महाराष्ट्रातल्या मतदारांनी तर याचा दारुण अनुभव गेल्या वर्षी घेतला आहे. लोकसभेला महाविकास आघाडीला ४८ पैकी ३० जागा मिळालेल्या असताना सहाच महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये या पक्षांचे पानिपत व्हावे हे कोणाच्याही कल्पनेच्या बाहेरचे होते. याच सहा महिन्यात नव्याने समाविष्ट झालेले लाखोंनी मतदार, संध्याकाळी सहानंतर झालेले शंकास्पद मतदान याबाबत यापूर्वी बोलून झाले आहे. पण तेव्हा कोणाहीकडे ठोस पुरावे नव्हते. आता महाराष्ट्रात काय घडले असावे याचा अंदाज कोणालाही बांधता येईल. राज्यातील पक्षांनीही याच धर्तीवर महाराष्ट्रातल्या एकेका मतदारसंघांचा अभ्यास केला तर त्यांनाही नक्कीच असे पुरावे मिळतील. भाजप जर प्रामाणिक असता तर या आरोपांची योग्य ती चौकशी व्हावी अशी भूमिका त्याने घेतली असती. पण देवेंद्र फडणवीस व इतरांनी राहुल यांनी दिलेल्या तपशीलावर न बोलता त्यांचे मेंदूतली चीप चोरीला गेली आहे अशी प्रतिक्रिया दिली. ती अत्यंत घाणेरडी व खालच्या पातळीची होती. वास्तविक याची निःपक्ष चौकशी होऊन राहुल यांचे आरोप चुकीचे ठरले तर भाजपचाच फायदा आहे. पण चोराच्या मनात चांदणे असा हा प्रकार असल्याने भाजप चौकशीची मागणी करीत नाही. भारतीय लोकशाही कधी नव्हे इतकी धोक्यात आहे.

विचार

# इंदूरलाच स्वच्छ शहराचा पुरस्कार का?

***खाद्यप्रेमींचे शहर, संस्कृती आणि वारसा जपणारे क्षेत्र आणि मिनी मुंबई म्हणून ओळखले जाणारे शहर म्हणून इंदूरची ओळख आहे. अहिल्याबाई होळकर यांची ही कर्मभूमी. या शहराने देशात आठव्यांदा स्वच्छ शहराचा पहिल्या क्रमाकांचा पुरस्कार मिळवला. शहर स्वच्छ होते, तेव्हा ते पर्यावरणाही राखले जाते आणि लोकांचे आरोग्यही उत्तम राहते. इंदूरने हे यश कसे मिळवले, यावर टाकलेला प्रकाशझोत.***



केंद्रीय नगरविकास मंत्रालयाने स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये अनेक वर्षांपासून अव्वल स्थानावर असलेल्या शहरांसाठी ‘सुपर स्वच्छता लीग’ सुरू केली. त्यामुळे प्रत्येक वेळी अव्वल स्थानी असलेल्या शहरांनी आपली कार्यपध्दती आणखी बदलावी आणि स्वच्छ सर्वेक्षणात इतर शहरांशी स्पर्धा करावी, अशी योजना आखण्यात आली. यामुळे अधिक सुधारणा होईल, असे अपेक्षित आहे. अशा या सुपर स्वच्छता लीगमध्येही आधीच देशातले सर्वात स्वच्छ शहर म्हणून चर्चेत राहिलेले इंदूर अव्वल स्थानी राहिले. इंदूरची ही कामगिरी केवळ एक प्रशासकीय प्रयत्न नाही, तर तेथील प्रत्येक नागरिकाच्या सामूहिक जबाबदारीची शर्यत आहे. माळवा प्रांतातील इंदूरचे वैशिष्ट्य असे की या शहराचे प्रशासक जे काही ठरवतात, ते साध्य केले जाते. इंदूरने तीन ‘आर’वर काम केले. रिड्यूस, रीयूज आणि रीसायकल; पण आता आणखी एका आर म्हणजेच ‘रिप्रोड्यूस’वरही लक्ष केंद्रित केले जात आहे. इंदूरमध्ये कचर्‍यापासून नवीन उपयुक्त गोष्टी बनवल्या जातात. सेंद्रिय कचर्‍यापासून खते बनवली जातात. प्लास्टिक आणि इतर निरुपयोगी वस्तूंचा पुनर्वापर करून नवी उत्पादने बनवली जातात. इंदूरमध्ये कचरा आता नावालाही राहिला नाही. कारण तो उत्पन्नाचा स्रोत बनला आहे. इंदूर महानगरपालिकेने ‘झिरो लँड फ्री सिटी’च्या दिशेने पावले उचलली आहेत. याद्वारे, प्रक्रिया केल्यानंतर उरलेल्या निरुपयोगी सुक्या कचर्‍यापैकी सुमारे पाच टक्के जमिनीखाली गाडून एक थर तयार केला जात आहे. यामुळे जमीन भरण्यास मदत होते. महानगरपालिका कचर्‍यापासून वीजनिर्मिती करण्याचाही प्रयत्न करत आहे.

या सर्व प्रयत्नांची गाथा विशेष बोलकी आहे. अलिकडेच इमारत बांधकाम क्षेत्रात प्रक्रिया केलेल्या गटाराच्या पाण्याचा वापर करून इंदूरमध्ये चांगली सुरुवात करण्यात आली आहे. त्याचे चांगले परिणाम मिळत आहेत आणि पैसेही मिळत आहेत. इंदूरमधील घरांच्या बाथरूम आणि स्वयंपाकघरातील सांडपाण्याचा योग्य वापर हेदेखील एक मोठे यश आहे. इंदूरच्या स्वच्छतेच्या यशामागे कठोर परिश्रम आहेत. त्याची खरी सुरुवात १९१३ मध्ये होळकर राज्यात झाली. तेव्हा शहरात कचरा टाकणार्‍या लोकांना दंड आकारण्यात येऊ लागला. १९७०-८० च्या दशकात इंदूर नवीन आकार घेत होते आणि वसाहती उभ्या रहात होत्या. तेव्हाही स्वच्छतेला खूप महत्त्व दिले जात होते. २०१४ नंतर देशात पहिल्यांदाच स्वच्छ शहर पुरस्कार सुरू झाला, तेव्हा इंदूरच्या वसाहती स्वच्छतेसाठी सुरू झालेल्या राष्ट्रीय मोहिमेचा एक भाग बनल्या. भारतात पहिल्यांदाच प्रत्येक घरातून कचराकुंड्यांमध्ये कचरा गोळा करण्याची मोहीम इंदूरमधूनच सुरू झाली.

**मिलिंद बेंडाळे**

ती एक मैलाचा दगड ठरली. नंतर, ओला आणि सुका कचरा वेगळा गोळा करण्यास सुरुवात झाली. ओल्या कचर्‍याच्या शुद्धीकरणासाठी जवळ प्लांट उभारण्यात आले. इंदूरमध्ये दिल्लीसह इतर अनेक महानगरांप्रमाणे देवगुराडिया गावाजवळ कचर्‍याचे ढीग होते. त्याची दुर्गंधी सुटायची. १५ लाख टन कचरा हटवण्याच्या सुरुवातीच्या उपक्रमामुळे सर्वांचे लक्ष इंदूरकडे वेधले गेले आणि २०१७ मध्ये पहिल्यांदाच इंदूरने देशातील सर्वात स्वच्छ शहराचा किताब जिंकला; केवळ जिंकला नाही तर आजपर्यंत कायम ठेवला.

इंदूर महानगरपालिकेचे वार्षिक बजेट आठ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. यामध्ये दोन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम स्वच्छतेसाठी खर्च केली जात असल्याचे सांगितले जाते. यामध्ये पगार आणि इतर विविध खर्चदेखील समाविष्ट आहेत. येथील लोकांकडून अगदी नाममात्र वापरकर्ता शुल्क वसूल केले जाते. झोपडपट्टीवासीयांकडून ६० रुपये, मध्यम वर्गीयांकडून ९० रुपये आणि श्रीमंतांकडून १५० रुपये मासिक शुल्क घेतले जाते. हे केवळ लोकसहभागच नाही, तर जबाबदारी निर्माण करते. शहर स्वच्छतेत अव्वल असल्याने लोकांची मानसिकता बदलली आहे. स्वच्छतेचा संस्कार इंदूरच्या लोकांमध्ये इतका रुजला आहे, की ते स्वतः कचरा इकडे तिकडे टाकत नाहीत आणि इतरांनाही टाकू देत नाहीत. रस्त्यांवर इकडे तिकडे थुंकण्याची लोकांची सवयही बदलली आहे. लोकांच्या जीवनमानात सुधारणा होण्यासोबतच इतर फायदेदेखील दिसून येत आहेत. रिअल इस्टेटचे दर वाढत असताना गुंतवणूकदारदेखील इंदूरकडे आकर्षित होत आहेत. इंदूर हे इतर शहरांसाठी एक उदाहरण बनले आहे. देशातील सुपरक्लीन शहरांमध्ये इंदूर प्रथम आले आहे, तर सुरत दुसर्‍या स्थानावर आहे. नवी मुंबई शहर तिसर्‍या स्थानावर आहे.

देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून इंदूरची निवड होण्याची ही सलग आठवी वेळ आहे. इंदूरची स्वच्छता यात्रा हा केवळ प्रशासकीय प्रयत्न नाही, तर जनतेच्या सहभागाने मिळालेले मोठे यश आहे. इंदूर स्वच्छतेत आठव्यांदा अग्रेसर राहिले. कारण हा केवळ एक संकल्प नाही, तर संपूर्ण शहराच्या सामूहिक शक्तीचा पुरावा आहे. इंदूरने स्वच्छतेमध्ये असे अनेक नवोपक्रम केले आहेत, जे देशातील इतर कोणत्याही शहरात केले गेले नाहीत. इंदूर ‘झिरो वेस्ट वॉर्ड’, ‘सेल्फ सस्टेनेबल झोन’ या सारख्या नवीन उपक्रमांवर काम करत आहे. आता शहरात मागणीनुसार कचरा संकलन सुरू झाले आहे. येत्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी लोकसभा मतदारसंघात स्वच्छतेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी इंदूर महानगरपालिका भागीदार बनेल. इंदूर आणि वाराणसी महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनासाठी एकत्र काम करतील. मंदिरे, गंगा घाट इत्यादी स्वच्छतेमध्ये इंदूरचे स्वच्छता मॉडेल राबवण्यात येणार आहे. महानगरपालिकेने शहराच्या सुशोभीकरणाकडेही विशेष लक्ष दिले आहे. महानगरपालिकेने शहराच्या सौंदर्याला बाधा पोहोचणार्‍या सर्व ठिकाणी रंगकाम, सर्जनशील गोष्टी बनवणे, भिंती आणि घरांवर घोषवाक्य लिहिणे अशी कामे केली. शहरातील चौक, बसस्थानक, विमानतळ आणि सार्वजनिक वाहतुकीच्या प्रमुख ठिकाणी विशेष सजावट करण्यात आली. महानगरपालिकेने शहरातील रस्त्यांवरील कचराकुंड्यांमधून नियमित कचरा गोळा करण्यावरही विशेष भर दिला. शहरातील रस्ते स्वच्छ करण्यासाठी परदेशातून यंत्रे मागवण्यात आली.

प्रक्रिया केलेले पाणी विकण्यास सुरुवात करणारे इंदूर हे मध्य प्रदेशमधील पहिले शहर आहे. शहरातील रहिवासी ३११ या ॲपवर कॉल करून प्रक्रिया केलेले पाणी मागवू शकतात आणि ते इमारत बांधकामात वापरू शकतात. अशा प्रकारे घरांमधील बाथरूम आणि स्वयंपाकघरांमधून बाहेर पडणारे घाणेरडे पाणीदेखील महानगरपालिकेसाठी उत्पन्नाचे साधन बनले आहे. आतापर्यंत हे दूषित पाणी इंदूरसाठी एक समस्या होती; परंतु महानगरपालिकेने पुनर्वापर केलेले पाणी विकण्यास सुरुवात केली. शहरात मेट्रो प्रकल्प बांधणार्‍या दोन कंपन्यांनी महानगरपालिकेकडून दररोज एक लाख लिटर पाणी विकत घेतले. महानगरपालिकेने कंपन्यांना प्रति हजार लिटर १.४० रुपये दराने पाणी विकले. शहरात दररोज ३०० एमएलडी पाण्यावर प्रक्रिया केली जाते. आज इंदूरमध्ये आशियातील सर्वात मोठा बायो सीएनजी प्लांट आहे. केवळ देशच नाही, तर जगातील इतर देशांतील शिष्टमंडळे ते पाहण्यासाठी आली आहेत. शहरी गृहनिर्माण आणि विकास मंत्रालयानेही देशभरात ते लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. हे कचर्‍यापासून संपत्तीचे एक चांगले उदाहरण आहे. इंदूरच्या जनसहभाग मॉडेलचे देशभर कौतुक केले जाते. नवोपक्रमांची मालिका, परस्पर समन्वय आणि काही तरी नवीन करण्याची आवड इंदूरला इतर शहरांपेक्षा पुढे ठेवते. आज जेव्हा इतर शहरे पहिल्या, दुसर्‍या आणि तिसर्‍या स्थानासाठी संघर्ष करत असताना इंदूरने सलग आठ वर्षे अव्वल स्थानावर राहून विशेष यश संपादन केले आहे.

इंदूर महानगरपालिकेने कचरा शुल्कातून सुमारे ४० कोटींचे उत्पन्न मिळवले. एवढेच नाही तर, कचर्‍यापासून तयार केलेल्या कच्च्या मालातून दर वर्षी १.५ कोटी रुपये कमावले. इंदूर महानगरपालिकेची स्वच्छतेची व्यवस्था इतकी पद्धतशीर आणि जलद आहे की शहरात घाण दिसत नाही. लोक प्रशासनाला चांगले सहकार्य करतात आणि कचरा पसरवत नाहीत. इंदूर महानगरपालिका क्षेत्रात कचरा व्यवस्थापन उत्कृष्ट आहे. अनेक शहरांमध्ये लग्न, समारंभ, सभा, रॅलीनंतर वापरलेले ताट, कचरा इत्यादी फेकून दिले जाते. इंदूरमध्ये प्रत्येक लहान-मोठ्या कार्यक्रमानंतर लगेच स्वच्छता केली जाते. शहरातील लोकांनाही आता स्वच्छतेची सवय झाली आहे. येथील लोकांमध्ये सर्वाधिक जागरूकता दिसून येते. लोक त्यांच्या वाहनांमध्ये कचराकुंडी घेऊन जातात. एखादी व्यक्ती रस्त्यावर कचरा पसरवत असल्यास नागरिक त्यांना कचरा उचलून कचराकुंडीत टाकण्यास सांगतात.

चर्चा आजची

## अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीची गरज

पुर्वी मोठ्या शहरांमध्ये अंमली पदार्थांची तस्करी, विक्री केली जात होती. शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी याच्या आहारी जाण्याचे संकट निर्माण झाले होते. आता मात्र अंमली पदार्थ तस्करी, विक्री, वाहतूकीचे जाळे ग्रामीण भागातदेखील पसरले आहे. पर्यटन व औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने महत्वाचे असलेल्या जिल्ह्यात

छुप्या पध्दतीने चरस, गांजाची विक्री केली जात आहे. नशामुक्तीसाठी रायगड पोलिसांनी आता पुढाकार घेतला आहे. अंमली पदार्थ तस्करी, विक्री, व्यापार व उत्पादनावर आळा बसविण्यासाठी हा प्रयत्न केला जाणार आहे. त्यासाठी जिल्ह्यात वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जिल्हयात जनजागृतीची गरज निर्माण झाली आहे. रायगड जिल्हा पर्यटनाबरोबच औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. वेगवेगळ्या भागातून जिल्ह्यातून व राज्य, देशभरातून पर्यटक रायगड जिल्हयात येत आहेत. जिल्ह्यात फिरण्यासाठी येत असताना काही पर्यटक गांजा, चरस सारख्या अंमली पदार्थांचा वापर करीत असल्याचे चित्र आहे. काही बंद कारखाने व दुकान व अन्य ठिकाणी चरस, गांजाची विक्री वाहतूक केली जाते. अंमली पदार्थाच्या आहारी जाऊन तरुणाई बघडण्याची भिती निर्माण झाली आहे. रायगड पोलिसांनी आतापर्यंत रोहा, खालापूर,मुरूड अशा अनेक ठिकाणी कारवाई करून अंमली पदार्थ विक्री, वाहतूक करणार्‍यांना दणका दिला आहे. तरीदेखील काही महाभाग गांजाची विक्री करीत आहेत. नशा येणार्‍या या अंमली पदार्थापासून तरुण पिढी दुर राहवी, यासाठी रायगड पोलिसांनी पावले उचलली आहेत. नशामुक्त रायगडसाठी कारवाई आणि जनजागृतीची मोहिम पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु केली जाणार आहे. रायगड पोलीस आणि जिल्हा सामान्य रुग्णालयातील जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमाच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम घेण्यात येणार आहेत. यामध्ये मनोरुग्ण तज्ञ डॉ. अर्चना सिंग यांची मदत घेतली जाणार आहे. अंमली पदार्थांपासून तरुणाईला दुर ठेवण्यासाठी पोलिसांकडून कारवाईचे पाऊल उचलले जाणार आहे. अंमली पदार्थांची अनाधिकृतपणे तस्करी, साठा, विक्री करणार्‍यांवर कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी १९३३ हा मानस हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वीत केला आहे.

केंद्र व राज्य शासनाने भारत देश नशा मुक्त करण्याचे धोरण अवलंबले आहे. अंमली पदार्थ तस्करी, व्यापार, उत्पादनावर आळा बसावा, यासाठी कोकण परिक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी जिल्हा स्तरावर अंमली पदार्थ विरोधी मोहिम राबविण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार

**प्रमोद जाधव**

जिल्हयात वेगवेगळे उपक्रम राबवून नशामुक्त जिल्हा करण्याचा प्रयत्न राहणार आहे. रायगड पोलीसांसह जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती केली जाणार आहे. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला जाणार आहे. अंमली पदार्थांची विक्री, वाहतूक करणार्‍यांविरोधात कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी हेल्पलाईन क्रमांक देण्यात आला आहे.

रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने बहिणीने भावाला नशा सोडून दिर्घ आयुष्य लाभावे यासाठी बहिण मागते ओवाळणी, नको करू नशेने शरीराची हानी या स्लोगनद्वारे तरुण पिढीला विशेष करून भावांना आवाहन करण्यात येत आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गणेशोउत्सव साजरा होत असताना, दहा दिवसाच्या कालावधीत बेटी पढाव, प्लास्टीक मुक्ती असे समाजप्रबोधान चिलचित्रामार्फत केले जातात. यावर्षी गणेशोत्सवात गणेशोत्सव मंडळामार्फत अंमली पदार्थ विरोधी जनजागृती, व्यसनमुक्तीचे देखावे तयार करून जनजागृती करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यामध्ये तीन हजारहून अधिक शाळा महाविद्यालये आहेत. या शाळांमध्ये शिक्षण घेणार्‍या विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी रायगड पोलिसांकडून प्रयत्न केले जाणार आहेत. जिल्हा रुग्णालयातील टीम, पोलीस दलातील निर्भया पथक, पोलीस ठाण्यातील पोलीस काका, दीदी यांच्या मदतीने शाळा व महाविद्यालयांमध्ये वेगवेगळे उपक्रम राबविले जाणार आहे. अंमली पदार्थाचे दुष्पपरिणाची माहिती विद्यार्थ्यांना मार्गदर्शनातून दिली जाणार आहे. नशा येणार्‍या अंमली पदार्थाच्या आहारी गेल्याने तरुण पिढी मानसिक दृष्ट्या खचून जाण्याचा धोका कायमच राहिला आहे. अंमली पदार्थाच्या आहारी गेल्याने काही तरुण आत्महत्या करतात. मानसिक स्वास्थ बिघडण्याची भिती असते.अंमली पदार्थाच्या आहारी गेलेल्या तरुण पिढीचे मानसिक स्वास्थ समस्या सोडविण्यासाठी १४४१६ हा हेल्पलाईन नंबर कार्यान्वीत केला आहे.

आपल्या मुलांकडून अंमली पदार्थाचे सेवन होणार नाही, याकडे पालकांनीदेखील लक्ष देण्याची गरज आहे. नशा येणार्‍या गांजा, चरससारख्या अंमली पदार्थाची विक्री गावात, शहरी भागात होऊ नये,यासाठी प्रत्येक नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजेत. अन्यथा तरुण पिढी बरबाद होण्यास वेळ लागणार नाही.

लोकसंसद

## नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन, सुखाचे आणि आनंदाचे सण!



दरवर्षी नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन हे सण एकाच दिवशी असतात. मात्र यंदा पौर्णिमेची तिथी दोन दिवसात विभागून आल्याने हे सण वेगवेळ्या दिवशी आले आहेत. ८ ऑगस्टला नारळी पौर्णिमेचा सण तर ९ ऑगस्टला रक्षाबंधनाचा सण साजरा केला जाणार आहे. नारळी पौर्णिमा हा मुंबईसह महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील कोळी बांधवाचा महत्त्वाचा सण आहे. कोळी बांधव मोठ्या जल्लोषात नारळी पौर्णिमा हा सण साजरा करतात. समुद्राचे यथासांग पूजाविधी पार पडल्यानंतर कृतज्ञता म्हणून सागराला नारळ अर्पण करतात. तसेच उपजीविकेचे साधन असलेल्या बोटींची पूजा केली जाते. नंतर आपल्या बोटी सजवून कोळी बांधव पुन्हा एकदा मासेमारी व्यवसायाची सुरुवात करतात. या दिवशी घरोघरी नारळी भात, नारळाच्या वड्या, नारळाच्या करंज्या, लाडू अशा गोडधोड पदार्थांची रेलचेल असते. यावेळी कोळीवाड्यात सर्वत्र आनंदाला उधाण आलेले असते. दुसरीकडे रक्षाबंधन हा सण म्हणजे बहीण भावांच्या पवित्र नात्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस! या दिवसाला राखी पौर्णिमा असेही म्हटले जाते. बहीण भावांच्या प्रेमळ नात्याने आणि भावनांच्या ओलाव्याने ओथंबलेल्या, विश्‍वासाच्या अतूट धाग्यात गुंफलेल्या रक्षाबंधनाच्या सणामुळे सर्वांचाच आनंद शतगुणित होतो. यंदाच्या नारळी पौर्णिमेची आणि रक्षाबंधनाची तिथी १९३० सालच्या नारळी पौर्णिमेची आणि रक्षाबंधनाच्या तिथीसारखीच असल्याने तब्बल ९५ वर्षानंतर शुभ मुहूर्ताचा एक दुर्मीळ योग जुळून आला आहे. त्यामुळे यंदाचे रक्षाबंधन खास असेच आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

## अलौकिक सण रक्षाबंधन

दरवर्षी श्रावणी पौर्णिमेला रक्षाबंधनाचा सण सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हिंदू धर्मातील सण उत्सवांविषयी अन्य धर्मियांकडून नेहमी आश्‍चर्य व्यक्त केले जाते की यांचा प्रत्येक सण वा उत्सव मानवजातीला प्रेरक व स्फूर्तीदायी असतो. त्यामागे अध्यात्मिक रहस्यांबरोबरच मानवी मूल्ये दडलेली असतात. रक्षाबंधनाच्या बाबत देखील महान आध्यात्मिक रहस्य दिसून येते. रक्षाबंधनाचा उद्देश केवळ भावाने आपल्या बहिणीची रक्षा करणे एवढ्यापुरतेच मर्यादित नाही तर हा सण सर्व आत्म्यांना ईश्‍वरी स्नेहाने वा पवित्रतेच्या धाग्याने बांधणारा आहे. सर्वांपर्यंच निर्मळ स्नेहाचा प्रवास पोचवणारा आहे. या सणाचा संबंध ईश्‍वरीच दिव्य कर्तव्याशी निगडीत आहे. या दिवशी पवित्रतेच्या रक्षणासाठी ब्राह्मण यजमानाला तर बहिण भावाला राखी बांधते. त्यामुळे प्रचलित सर्व सणात आध्यात्मिक दृष्ट्या अतिशय महत्वपूर्ण आणि जीवन परिवर्तन करणारा असा हा रक्षाबंधनाचा सण आहे.

रक्षाबंधनाच्या वेळी सर्वप्रथम बहिण भावाच्या कपाळावर तिलक लावले. त्यानंतर त्याच्या हातावर राखी बांधते. तिलक हे आत्मिक स्मृतीचे प्रतिक आहे. तसेच राखी हे संयम आणि मर्यादांचे प्रतिक आहे. त्यामुळे रक्षाबंधनाचे वास्तविक रहस्य आहे. आत्मस्वरूपामध्ये स्थित राहून संपूर्ण पवित्रतेची पालना करणे. त्याचबरोबर अन्य आत्म्यांना देखील त्यासाठी सहयोग देणे, पवित्रतेद्वारेच वर्तमान व भविष्यजीवन तसेच जन्म श्रेष्ठ आणि सुखी बनवता येतात. पवित्रतेचे कल्याणकारी बंधन असे आहे की ज्यामुळे अन्य सर्व बंधने नाहीशी होतात. म्हणूनच म्हटले जाते, ‘रक्षाबंधन पवित्र बंधन, बांधून सारे व्हा निर्बंधन!’

रक्षाबंधनाला पुण्यप्रदायक व विषतोडक पर्व असेही म्हटले जाते. कारण कामवासना हेच भयंकर विष आहे. त्याला पवित्रता व ब्रह्मचर्य व्रताद्वारेच जिंकता येते. त्यामुळेच रक्षाबंधन हे इंद्रियजीत बनवणारे, देवत्व बहाल करणारे, पुण्यप्रदायक पर्व आहे. अर्थात स्वतःला आत्मा समजून, देह व देहाच्या आकर्षणापासून अलिप्त, पवित्र दीवन व्यतीत करून मनातील आसुरी वृत्तींवर विजय प्राप्त करण्याचे प्रतीक आहे.

रक्षाबंधन आपल्याला आत्मिक दृष्टी-वृत्ती पक्की करण्याची प्रेरणा येते. अर्थात सर्वांना स्थुल दृष्टीने स्त्री-पुरूष न बघता, आत्मा भाऊ-भाऊ समजण्याची प्रेरणा देते. अशा प्रकारची सात्विक दृष्टी-वृत्ती बनवण्यासाठी पवित्रतेची पावना महत्वाची आहे. त्याबरोबरच परमात्मा जो परमपवित्र आहे, त्याच्या समीप पोचण्यासाठी पवित्रला हाच एकमात्र सोपान आहे. पवित्रतेच्या धारणेनेच आपण भविष्य देवपदांचे अधिकारी बनतो. सारांशाने, पवित्रता हीच सुख-शांतीची जननी आहे हाच रक्षाबंधनाचा वास्तविक संदेश आहे.

रक्षाबंधनानिमित्ताने बहिणीची अपेक्षा केवळ तिच्या रक्षणापुरती नसते तर आपल्या भावाच्या मनात प्रत्येक स्त्रीकडे पाहण्याचा अभिभाव पवित्र रहावा अशी असते. बहिणीच्या शुभ संकल्पांचा राखी द्वारे स्विकर करून भावाने तसेच पवित्र दृष्टी ठेवण्याची ओवाळणी घालावी. खरेतर पवित्रतेचे हे व्रत खर्‍या अर्थाने श्री सत्य नारायणाचे श्रेष्ठ व्रत आहे. शेवटी रक्षाबंधनाचे एक गीत लिहावेसे वाटते,

**‘रक्षाबंधनाचा दिवस आला**
**आनंदोत्सव घेऊन आला**
**दिव्य प्रकाशाच्या ज्योतीचा**
**अमर आहे बंधन सुख-शांतीचे**
**प्रेम-पवित्रता मला आवडले**
**आनंदोत्सव साजरे झाले.**

**– ब्रह्माकुमारी भारती दीदी**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.२०२/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. सुजाता मनोहर शिंदे-लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. सुजाता अनिल खराडे- लग्नानंतरचे नाव
वय: ४४, वर्षे, धंदा : गृहिणी,
रा. रूम नं. ०८, चाळ नं. ३२, कामगार हॉस्पीटल रोड, रामचंद्रनगर, ठाणे — अर्जदार

विरूध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत गांगवली, ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. सुजाता मनोहर शिंदे-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. सुजाता अनिल खराडे-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे गांगवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०३/१०/१९८१ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि.०५/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार श्रीम. सुजाता मनोहर शिंदे-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. सुजाता अनिल खराडे-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे गांगवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०३/१०/१९८१ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. सुजाता मनोहर शिंदे-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. सुजाता अनिल खराडे-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे गांगवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०३/१०/१९८१ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव — सही
ता. ०८/०८/२०२५ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे अशील यांनी मिळकतीचे विद्यमान मालक **संतोष शिवाजीराव देशमुख, दहिवली, समर्थनगर, ता. कर्जत, जि. रायगड** यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मौजे दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १२ | २ | ०-१०-४० | १.०० |

सदरची शेतजमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तद्ंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशीलांस विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दिनांक : ९/०८/२०२५
अशिलांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. मनिषा पुंडलिक गायकर**
मु. डिकसळ, पो. चिंचवली, ता. कर्जत,
जि. रायगड मो.नं. ९९७०५९५९५२

## पनवेल महानगरपालिका

शहर अभियंता विभाग
दरपत्रक

जा.क्र.पमपा/बांधकाम/४४२५/प्र.क्र.१२/२७८७/२०२५
दिनांक :- ८-८-२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate)मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात तिसऱ्या मजल्यावरील सभागृह येथे Active LED Screen बसविणे. | ०९-०८-२०२५ ते १६-०८-२०२५ (०७ दिवस) |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. ०९-०८-२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वत:च्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmbandhkamdept01@gmail.com या ई-मेलवर मुदतीत पाठविण्यात यावे ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

## कर्जत नगर परिषद

Karjat Municipal Council
ता. कर्जत जि. रायगड पिन -४१०२०१
E-mail :karjatcouncil@gmail.com
ऑफीस : ०२१४८-२२२०३३
फॅक्स : २२१३१२

जावक क्रमांक इ.बां.वि./१३८२/२५-२६ — दिनांक ०८/०८/२०२५

### जाहिर नोटीस

विषय:- मौजे मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील स.नं. ७ ब मधील मंजूर अभिन्यासातील ६.०० मी. रुंदीचा रस्ता ९.०० मी. प्रस्तावित करणेबाबत.

या नोटीसीद्वारे कर्जत नगरपरिषद रस्ता हद्दीमधील नागरीकांना कळविण्यात येते की, विषयामध्ये नमूद केलेला रस्ता रुंद करण्याबाबत प्रस्ताव नगरपरिषदेने हाती घेतलेला आहे. सदर रस्ता हा ३० फुट (९.० मी) रुंदीचा करणेत येत असून त्याची आखणी ही नकाशावर करणेत आलेली असून त्याप्रमाणे जागेवर ही आखणी करणेत आलेली आहे व त्याप्रमाणे रस्ता बनविणेत येणार आहे. तसेच त्यासंदर्भात नगरपालिका ठराव क्र ३१२ दि. ०१/०८/२०२५ अन्वये पारीत केलेला आहे.

सदर कार्यवाही ही महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायत व औद्योगिक नगर अधिनियम १९६५ चे कलम १७५ व १७६ नुसार करणेत येत आहे.

वरील बाबतीत कोणचेही काही म्हणणे असल्यास ती या नोटीशीचे दिनांकापासून एक महिन्याचे आत मुख्याधिकारी, कर्जत नगरपरिषद यांचेकडे कायदेशीर कागदपत्रासह सादर करावे. रस्ता आखणीचे नकाशे नगरपालिका कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहणेसाठी उपलब्ध आहेत, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**कर्जत नगरपरिषद कर्जत**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे पिंपळपाडा, ता. कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक अविक अंजन चटर्जी व सुछंदा अंजन चटर्जी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे .

**मौजे.पिंपळपाडा,ता.कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ४७ | ८ | ०-६९-०० | ०-५० |
| ४४ | १/अ/१ | ०-४०-०० | ०-१५ |
| ४४ | १/अ/२ | २-९८-०० | २-५५ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०९/०८/२०२५
मो. ९९२१७२२२००
खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२,साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

दिनांक : ०९/०८/२०२५

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक विजयकुमार गजानन भगत, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| कावीर ता. अलिबाग | ५१२ | क्षेत्र १-७३-३०<br>पो.ख. ०-२२-००<br>एकूण १-९५-३० | ४४.१९ |

दिनांक : ०९/०८/२०२५
अशिलांची सही
**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मारेश्वर अपार्टमेंट जे. एस. एम कॉलेज जवळ,
अलिबाग- रायगड मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

मौजे मालेगाव तर्फे कोतलखलाटी, ता. कर्जत, जि.रायगड.

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र चौ. मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| पाल्म पॅराडाईज रिअलेटर्स एल.एल.पी. तर्फे भागीदार श्री. विश्वास श्रीधर माने श्री. समद हमीद मकानी | ५८/२० | ३८३ चौ.मी. | ३८-३० |

तरी, वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०९/०८/२०२५
**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. २०८/२०२५

**मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्री. बारकु पांडु शिंदे
वय ८० वर्षे, धंदा : शेती,
सध्याचा पत्ता :- दिवाण ॲण्ड शहा जवळ, वालीव फाटा, सातीवली, ठाणे — अर्जदार
कायमचा पत्ता :- अंबर्ले, कातलाचा कोंड, ता. माणगांव, जि. रायगड

विरूध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह, नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत अंबर्ले,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. बारकु पांडु शिंदे यांचे भाऊ कै. दत्ताराम महादेव शिंदे हे दि. ०७/०५/१९७० रोजी मौजे अंबर्ले, कातलाचा कोंड, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले आहेत. त्यांचे मृत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. २८/०७/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे भाऊ कै. दत्ताराम महादेव शिंदे हे दि. ०७/०५/१९७० रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरीच जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. बारकु पांडु शिंदे यांचे भाऊ कै. दत्ताराम महादेव शिंदे हे दि. ०७/०५/१९७० रोजी मौजे अंबर्ले, कातलाचा कोंड, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले आहेत. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव — सही
ता.:०६-०८-२०२५ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## SARASWATI EDUCATION SOCIETY'S
## YADAVRAO TASGAONKAR POLYTECHNIC

Approved by AICTE & DTE, Affiliated to MSBTE, Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytpolytechnic.com, principal.ytp@tasgaonkartech.com

**ADMISSION NOTIFICATION against Cap Vacancy (ACAP)**

Applications are invited for Admission to First Year Diploma in Engineering (DEN) Against Cap Vacancy (ACAP) for various courses for academic year 2025-26.

| Sr. No | Name of Course | Course Code | Vacant Seats |
|---|---|---|---|
| 1 | Civil Engineering | 328219110 | 25 |
| 2 | Computer Engineering | 328224510 | 21 |
| 3 | Electrical Engineering | 328229310 | 09 |
| 4 | Information Technology | 328224610 | 01 |
| 5 | Mechanical Engineering | 328261210 | 37 |

The schedule of admission procedure is as follows,

1) Issue of application form at Office: 09.00 am to 4.00 pm from 09th of August 2025 to 11th of August 2025.
2) Submission of Completely filled application form: 10.00 am to 4.00 pm from 09th of August 2025 to 11th of August 2025.
3) Display of Provisional Merit List on Notice Board and Institute Website: 03.00 pm on 12th August 2025.
4) Sale of Information Brochure & Admission form: 09.00 am to 03.00 pm from 13th of August 2025 to 14th of August 2025.
5) Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents: 10.00 am to 05.00 pm from 13th of August 2025 to 14th of August 2025.
6) Cost of Information Brochure with Admission form: INR 200/- only.

For any queries contact to 8149679293 / 7030896095

Sd/
**Principal**

[redacted]

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

मिळकतीचे वर्णन :-
मौजे भिसराई, ता. अलिबाग, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.चौ.मी | रुपये | पैसे |
| १) श्री. रंजित शांताराम म्हात्रे<br>२) श्रीमती आदिती अतुल कुलकर्णी<br>३) श्री. अमित अशोक मोकल | १२५ | ० | ०-२९-९० | १ | २५ |
| १) श्रीमती अदिती अतुल कुलकर्णी | १२६ | ० | ०-०४-८० | ० | ५८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :-०९/०८/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल:-adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| श्रीम. प्रेरणा प्रशांत मिरकुटे व इतर -२ | १५८/२/क | ००-२३-०० | १-४४ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०९/०८/२०२५
**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## अंजुमने पैहम विसाले तालिम, पांगळोली

**मु. पो. पांगळोली, ता. म्हसळा, जि. रायगड ४०२ १०१**

### शिक्षक पाहिजेत

अंजुमने पैहम विसाले तालिम, पांगळोली संचालित १००% अनुदानित तत्वा वरील मौलाना अबुल कलाम आझाद हायस्कूल पांगळोली, ता.म्हसळा, जि. रायगड या उर्दू माध्यमाच्या अनुदानित हायस्कूलमध्ये शिक्षक सेवेकरीता जागा भरावयाची आहे.

| अनु. क्र. | शैक्षणिक पात्रता | इयत्ता | पद | पदसंख्या | श्रेणी/टीप |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | B.Sc/B.ED (गणित/विज्ञान) | ६ वी ते ८वी | शिक्षण सेवक | ०१ | अनुभवी उमेदवारास प्राधान्य |
| ०२ | B.A/M.A/ B.ED ( इंग्रजी ) | ९ वी ते १०वी | शिक्षण सेवक | ०१ | अनुभवी उमेदवारास प्राधान्य |

तरी खालील पत्त्यावर पात्र व इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह स्वखर्चाने दिनांक १८/०८/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मुलाखतीसाठी हायस्कूलमध्ये उपस्थित रहावे.

ठिकाण :- मौलाना अबुल कलाम आझाद हायस्कूल, मु.पो.पांगळोली, ता.म्हसळा जि. रायगड, ४०२१०१

**बिलाल अली कौचाली**
अध्यक्ष
संपर्क: ७७९८८१३०३०

**सलीम इब्राहीम वस्ता**
सचिव
संपर्क : ८८०६८०२७८९

## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.३७८/२०२५

श्रीम माई शांताराम जाधव उर्फ
माई बाळाराम भोईर
रा.कडसुरे पो.पिगोंडे
ता.रोहा, जि.रायगड — वादी

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी-ग्रामपंचायत राबगाव
ता.सुधागड, जि.रायगड — प्रतिवादी

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे**
**जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्रीम माई शांताराम जाधव उर्फ माई बाळाराम भोईर रा.कडसुरे पो.पिगोंडे ता.रोहा, जि.रायगड यांनी यांचा स्वतः चा जन्म दि. ०७/०१/१९८१ रोजी मौजे-राबगाव ता.सुधागड, जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर माई बाळाराम भोईर यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक : ०६/०८/२०२५
सही/-
**(उत्तम कुंभार )**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

दिनांक ०८/०८/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे सालपे, ता.कर्जत, जि.रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री.महेंद्र गजानन वावेकर | ६३/१ | ०-९४-१० | २-५६ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायमस्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेले आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्ट, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायेदशीर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जीमन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. पूजा प्रताप सुर्वे**
रा.पळसदरी, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमणध्वनी क्र.९२७१८७६०५०


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे अशिल यांनी मिळकतीचे विद्यमान मालक सौ.अनिता दिलीप शहा, श्री.विश्वेश दिलीप शहा दोघे रा.२०३, समर्थ अर्पाटमेंट, सरकारी हॉस्पिटलसमोर, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मौजे गौळवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ११४ | १ | ०-९९-२० | १.२५ |
| यापैकी विकत देणार यांच्या हिस्स्याचे क्षेत्र ०-२०-०० | | | |

सदरची शेतजमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तद्ंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांस विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दिनांक : ९/०८/२०२५
अशिलां तर्फे ॲडव्होकेट
**ॲड.मनिषा पुंडलिक गायकर**
मु.डिकसळ, पो.चिंचवली,
ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं. ९९७०५९५९५२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.राजेंद्र कृष्णनाथ नाईक व श्रीमती किरोन राजेंद्र नाईक यांच्या नावे मौजे - दहिवली तर्फे निड, ता.कर्जत, जि.रायगड येथे शिवम गार्डन्स या बिल्डिंगमधील विंग बी, बिल्डिंग नं.३, ब्लॉक नं.२०४ हि मिळकत आहे. कै.राजेंद्र कृष्णनाथ नाईक हे दिनांक २१/०९/२०२२ रोजी मयत झालेले असून त्यांचे पश्चात त्यांना पत्नी किरोन राजेंद्र नाईक व मुली १) अल्पा गौतम आचरेकर २) हिना आदित्य पेडणेकर हेच कायदेशीर वारस आहेत. वर नमुद ब्लॉक मिळकत किरोन राजेंद्र नाईक यांच्याच ताबेकब्जात असून त्यांचाच मालकी हक्काची आहे. तसेच १) अल्पा गौतम आचरेकर २) हिना आदित्य पेडणेकर यांची सदर मालकी हक्कास व ताबेकब्जास कोणतीही हरकत नाही.

तरी याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत खालील व्यक्तींकडे लेखी पुराव्यासह दाखल करावी. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०९/०८/२०२५

**ॲड. तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को. ऑप. हौ. सो. ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०८००८१३

**किरोन राजेंद्र नाईक**
अल्का गौतम आचरेकर
हिना आदित्य पेडणेकर
१ए/२०४, आर्यवर्त सोसायटी,
अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९९

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे अशील यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री.पांडुरंग लखू खाडे, पाषाणे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मौजे पाषाणे, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १०६ | ९ | ०-४३-३० | २.०६ |

सदरची शेतजमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तद्ंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशीलांस विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दिनांक : ९/०८/२०२५
अशिलांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. मनिषा पुंडलिक गायकर**
मु. डिकसळ, पो. चिंचवली,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९९७०५९५९५२

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात

जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड
क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र.४६/२०२५

१.श्री.प्रविण गजानन ठाकूर रा.भक्ती निवास,
घर नं.३६२७, गणेश नगर नं.१,करंजा रोड, ता.उरण, जि.रायगड
२. श्री.अमित दत्ताराम ठाकूर — **अपिलार्थी**
३. श्रीम.उषा दत्ताराम ठाकूर,
अ.क्र.२ व ३ रा.थळ, ता.अलिबाग, जि.रायगड

**विरुद्ध**

१ श्रीम.कल्पना विरभद्र राऊत, रा.थळ, ता.अलिबाग, जि.रायगड
२ श्री.अरुण कृष्णा म्हात्रे
३ श्री.राजेंद्र महादेव म्हात्रे
४ श्री.वामन कृष्णा म्हात्रे
५ श्री.अशोक कृष्णा म्हात्रे
६ श्री.मनोहर मधुकर म्हात्रे
७ श्रीम.कलावती प्रकाश घरत — **- उत्तरार्थी**
अ.क्र.२ ते ६ रा.तुडाळ, ता.अलिबाग, जि.रायगड
८ श्रीम.रेखा गजानन ठाकूर
रा.मुक्ती निवास, घर नं.३६२७, गणेश नगर नं.१,
करंजा रोड, उरण, ता.उरण, जि.रायगड
९ श्रीम.अनघा गणेश काठे
१० श्रीम.साधना जयेंद्र पाठारे अ.क्र.९ व १० रा.थळ,
ता.अलिबाग, जि. रायगड

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**


या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे थळ, ता. अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.२४८/१ क क्षेत्र ०-०८-६० हे.आर. आकार १.३० या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील आरटीएस अपील क्र.४२/२०२३, दि.१०/०२/२०२५ मधील आदेशाविरुद्ध या न्यायालयाकडे अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि. ११/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहील्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होत आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग — सही/-
दिनांक : ५/०८/२०२५ — **अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग करीता**

# निवडक

## बॅझबॉल म्हणजे बेजबाबदार क्रिकेट

**नवी दिल्ली :** बँझबॉल क्रिकेटने कंटाळवाण्या क्रिकेटला वेगवान आणि थरारक केले असले तरी काही दिग्गजांना ही शैली खटकत आहे. यात ऑस्ट्रेलियन माजी कर्णधार ग्रेग चॅपल यांचीही एण्ट्री झाली आहे. त्यांनी इंग्लंडच्या बॅझबॉल या आक्रमक फलंदाजीच्या शैलीवर कठोर टीका करताना सकारात्मक क्रिकेट म्हणजे बेधडक किंवा बेजबाबदार क्रिकेट नव्हे असे आसुड ओढलेत.



अण्डरसन तेंडुलकर मालिकेतील निर्णायक पाचव्या कसोटीत भारताने ६ धावांनी विजय मिळवून मालिका २-२ ने बरोबरीत आणली. शेवटच्या दिवशी इंग्लंडला केवळ ३५ धावांची गरज होती, तर भारताला ४ विकेट्स हव्या होत्या. मोहम्मद सिराजच्या तडाखेबंद गोलंदाजीमुळे हिंदुस्थानला संस्मरणीय विजय मिळवता आला. चॅपल यांनी लिहिलेल्या कॉलममध्ये भारतीय युवा संघाचे कौतुक केले असले तरी इंग्लंडच्या खेळाडूंची, विशेषतः हॅरी ब्रूकवर चांगलेच ताशेरे ओढले. ब्रूक हा प्रतिभावान क्रिकेटपटू आहे, त्याचं टायमिंग अप्रतिम आहे आणि विविध प्रकारचे फटके मारण्याची क्षमता आहे. मात्र कसोटी क्रिकेट हे फक्त फटकेबाजीचं नाव नाही. तिथे निर्णय घेण्याची क्षमता अत्यंत महत्त्वाची असते. योग्य वेळी संयम आणि योग्य वेळी आक्रमकता यातील समतोल राखणं आवश्यक आहे.

## फुटबॉलचे नवे गुरू खालिद जमील

**नवी दिल्ली :** अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) भारताचे माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू आणि सध्या इंडियन सुपर लीग संघ जमशेदपूर फुटबॉल क्लबचे व्यवस्थापक असलेले खालिद जमील यांची भारताच्या फुटबॉल संघाच्या प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. एआयएफएफने याबाबत घोषणा केली आहे.



खालिदने २०१७ मध्ये आयझॉल फुटबॉल क्लबला आय-लीग विजेतेपद मिळवून दिले होते. १३ वर्षांत प्रथमच भारताच्या फुटबॉल संघाचा प्रशिक्षक म्हणून एका भारतीय व्यक्तीची निवड करण्यात आली आहे. जमील यांची एआयएफएफ कार्यकारी समितीने तीन सदस्यांच्या यादीतून निवड केली आहे. इतर दोन दावेदारांमध्ये भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक स्टीफन कॉन्स्टेंटाईन आणि स्टीफन टाकाविच यांचा समावेश होते. स्टीफन यांनी यापूर्वी स्लोवाकिया राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षकपद भूषवले होते. महान स्ट्रायकर आयएम विजयन यांच्या अध्यक्षतेखालील एआयएफएफच्या तांत्रिक समितीने तीन उमेदवारांची यादी तयार केली होती. त्यातून जमील यांचे नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. राष्ट्रीय पुरुष संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम करणारे शेवटचे भारतीय सावियो मेडेरा होते. त्यांनी २०११ ते २०१२ पर्यंत हे पद भूषवले होते. जमील यांच्या नियुक्तीनंतर मध्य आशियाई फुटबॉल असोसिएशन नेशन्स कप ही स्पर्धा पार पडणार आहे. त्यामुळे त्यांच्या नियुक्तीनंतर भारताचा संघ कशी कामगिरी करतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ही स्पर्धा २९ ऑगस्टपासून ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तानमध्ये खेळली जाणार आहे.

## टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या नोंदणीस प्रारंभ

**पुणे :** राज्यभरातील टेनिस बॉल क्रिकेटपटूंना आपले कौशल्य दाखवण्याची आणि तब्बल एक कोटींहून अधिक रुपयांची बक्षीसे जिंकण्याची सुवर्णसंधी आता उपलब्ध होणार आहे. सकाळ माध्यम समूहातर्फे जगातील सर्वात मोठ्या टेनिस बॉल बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.




ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये ही स्पर्धा होणार असून, स्पर्धेच्या नोंदणीला प्रारंभ झाला आहे. व्यावसायिक क्रिकेटप्रमाणेच टेनिस बॉल बॉक्स क्रिकेट हे देशात लोकप्रिय असून, शहरांमध्ये विविध ठिकाणी नियमितपणे बॉक्स क्रिकेट खेळले जाते. येथे गुणवान खेळाडूंची जणू खाणच आहे. अशाच खेळाडूंचा शोध घेण्यासाठी आणि त्यांना योग्य व्यासपीठ मिळवून देण्यासाठी या भव्य स्पर्धेचे आयोजन केले आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर, सातारा, ठाणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, गोवा या शहरांमध्ये ही स्पर्धा होणार असून, १२ वर्षे वयापुढील खेळाडू या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. फ्रँचायझी पद्धतीने होणारी ही स्पर्धा असून, फ्रँचायझी व खेळाडूंसह किंवा केवळ फ्रँचायझी खरेदी करून अथवा केवळ खेळाडू म्हणूनही या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. स्पर्धेत विजेतेपद मिळवणाऱ्या संघाला तब्बल एक कोटी रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे.

## कुस्ती महासंघाची ११ खेळाडूंवर कारवाई

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय कुस्ती महासंघाने बनावट जन्म प्रमाणपत्र सादर केल्याच्या आरोपाखाली ११ कुस्तीपटूंना निलंबित केले आहे. दिल्ली महानगरपालिकेने ११० दस्तऐवजांची तपासणी केली असून त्यातील ११ प्रमाणपत्रे बनावट असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणात वयाशी संबंधित फसवणूक आणि मूळ राज्य लपवून स्पर्धेत प्रवेश मिळवण्याचा प्रकार उघड झाला आहे. त्यामुळे डब्ल्यूएफआयने ही मोठी कारवाई केली आहे. भारतीय कुस्ती क्षेत्र सध्या दोन मोठ्या समस्यांशी झुंजत आहे. यात काही जास्त वयाचे खेळाडू अल्पवयीन गटांमध्ये खेळत आहेत, तर काही खेळाडू बनावट जन्म प्रमाणपत्र सादर करून इतर राज्यांचे प्रतिनिधित्व करत आहेत. डब्ल्यूएफआयने संशयित कुस्तीपटूंच्या जन्म प्रमाणपत्रांची यादी दिल्ली महापालिकेला दिली होती. तपासणीनंतर एमसीडीने स्पष्ट केले की ९५ विलंबित नोंदणी प्रमाणपत्रे उपविभागीय दंडाधिकाऱ्यांच्या आदेशानेच जारी करण्यात आली होती.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- घर भाड्याने/विकणे आहे. भाडे १८,०००/- डिपॉजिट ५०,०००/- चेंढरे संपर्क - ९१७५८००४३०
- 'जन्नावार हॉस्पिटल' बायपास रोड चेंढरे-अलिबाग मध्ये नर्सची जागा (vacancy) आहे. Contact No 7798034509
- आमच्या येथे J.S.W. (जिंदाल) कंपनीचे जुने नवीन कलर कोटेड पत्र्याचे पत्रे मिळतील. संपर्क : बाबू सैय्यद, कोळीवाडा कस्टम ऑफिसच्या बाजूला. मो. ७७४९२५१६६
- विकणे आहे- भिवपुरी रोड स्टेशन वन रूम किचन फ्लॅट कमी किंमतीत विकायचा आहे. पोद्दार कॉम्प्लेक्स, फोन ०७०४५२१९८६९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# महाडच्या रोनकची रोप जंपमध्ये भरारी

### आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व | उत्तुंग यशाबद्दल कौतुकाचा वर्षाव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

जपानमध्ये नुकत्याच संपन्न झालेल्या जागतिक रोप जंप (दोरी उड्या) चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत महाड तालुक्यातील कुंबळे गावचा १६ वर्षीय तरुण रोनक दिपक साळवे याने चमकदार कामगिरी करून दाखविली आहे. आयजेआरयूने आयोजित केलेल्या या स्पर्धेत जगभरातून ३६ देशातील २६०० स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेत रोनक दिपक साळवे याने रौप्यपदक प्राप्त करून देशाची मान उंचावली आहे.

रोनक डोंबिवली येथील रहिवासी असून मूळचा महाड तालुक्यातील कुंबळे या गावचा आहे. शालेय शिक्षण घेत असतानाच इयत्ता नववीपासूनच त्याच्या मनात जंपरोप खेळाची आवड निर्माण झाली. त्यानंतर त्याने सराव करत बुलढाणा येथे राज्यपातळीवरील स्पर्धेत सहभाग घेतला.



रोनक सध्या प्रगती कॉलेज ऑफ कॉमर्स डोंबिवली येथे १२ वीमध्ये शिक्षण घेत आहे. यादरम्यान जपानच्या कावासाकी जंपरोप स्पर्धेसाठी सहभागी होणार असल्याची माहिती मिळताच, प्रगती कॉलेजचे चेअरमन जगन्नाथ पाटील आणि व्यवस्थापक, शिक्षक, कर्मचारी यांनी पुढाकार घेत सढळ हस्ते आर्थिक हातभार लावला.

या खेळात विविध स्पर्धेमध्ये त्याने यश संपादन केले आहे. जागतिक जंपरोप चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत रौप्य पदक मिळविले असून, राष्ट्रीय पातळीवर सात सुवर्ण व दोन रौप्यपदक, राज्यपातळीवर चार सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्यपदक तसेच मुंबई विभागीय स्तरावर एक सुवर्ण पदक संपादन केले आहे. आत्तापर्यंत रोनक ने एकूण वीस पदके मिळविली असून, सराव स्पर्धेत ३० सेकंदात १०० रोप जंप मारण्याची अद्भुत किमयाही त्याने साधली. रोनकने डबल अंडर म्हणजे एकाच उडीमध्ये रस्सी दोनदा पायाखाली फिरवणे दुहेरी उडी या खेळात ३० सेकंदात ९७ जंप मारण्याचा विक्रमही स्वतःच्या नावे केला.

या खेळातील त्याची प्रगती पाहून रोप जंप फेडरेशन ऑफ इंडियाने त्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड केली. त्याचा रोप जंपचा सराव सध्या डोंबिवलीमध्ये रुल-द -रोप या कोचिंग सेंटरमध्ये सुरू आहे. या टिमचे प्रशिक्षक अमन वर्मा हे गेले काही वर्ष डोंबिवलीतील विद्यार्थ्यांना शाळा व कॉलेजमध्ये जाऊन त्याला प्रशिक्षण देत आहेत. तसेच यासाठी अथक परिश्रम त्यांनी घेतले आहेत. वर्मा यांचे सतत मार्गदर्शन मिळत असते. ते नियमितपणे सकाळी चार तास व संध्याकाळी चार तास सराव करून २०२४ मध्ये जपान येथे झालेल्या एशियन चॅम्पियन रोप जंप स्पर्धेमध्ये चौथा क्रमांक मिळविला आणि तेव्हाच ठरवलं की, पुढील आंतरराष्ट्रीय चॅम्पियन स्पर्धेत पदक मिळवायचेच आणि जपान कावासाकी येथे झालेली रोप जंप चॅम्पियन २०२५ या स्पर्धेत रौप्य पदक मिळविले.

> कोणताही सरकारी निधी, खासगी प्रायोजक न घेता, स्वतःच्या खर्चाने या टीमने ही कौतुकास्पद कामगिरी केली आहे. त्यामुळे पुढे अशीच कामगिरी करण्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. लोकप्रतिनिधी, सरकारी निधी व खासगी प्रायोजकांकडून काही निधी मिळाल्यास या खेळासाठी अनेक नामवंत खेळाडू देशासाठी तयार होतील.
> –अमन वर्मा, प्रशिक्षक

> मला असं वाटतं की विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात आपले करिअर केले पाहिजे आणि जागतिक पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व करून भारताचे नाव मोठे केले पाहिजे.
> – रोनक साळवे, रौप्यपदक विजेता



## तनिष्काचा बुद्धिबळाच्या पटावर चेकमेट

**। बठिंडा । प्रतिनिधी ।**

वय हे केवळ एक आकडा आहे, ही म्हण बठिंडा येथील अवघ्या आठ वर्षे, चार महिन्यांच्या तनिष्का गर्गने अक्षरशः खरी करून दाखवली आहे. आपल्या विलक्षण बुद्धिमत्तेच्या आणि अचूक चालींच्या जोरावर तिने आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाचे (फिडे) मानांकन मिळवले असून, ही कामगिरी करणारी ती पंजाबमधील महिला गटातील सर्वात युवा खेळाडू ठरली आहे. गेल्या महिन्यात गुरुग्राम येथे झालेल्या ९ वर्षांखालील राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेतील तिच्या चमकदार कामगिरीमुळे तिला हे यश मिळाले. फिडेने ऑगस्ट महिन्यात अधिकृतपणे मानांकन जाहीर करताच तनिष्काच्या नावावर या ऐतिहासिक विक्रमाची नोंद झाली. भावासोबत प्रशिक्षणाला जाताना लागली खेळाची गोडीअवघ्या चौथ्या वर्षी केली सुरुवात कुटुंबाचा पाठिंबा आणि कठोर मेहनत ठरली यशाची गुरुकिल्ली. यापूर्वी हा विक्रम नऊ वर्षांहून अधिक वय असलेल्या तन्वीर कौर खिंदाच्या नावावर होता.



मात्र, तनिष्काने वयाच्या आठव्या वर्षीच हा टप्पा गाठून सर्वांना चकित केले आहे. तनिष्काचा बुद्धिबळाचा प्रवास तिच्या वयाच्या चौथ्या वर्षी सुरू झाला. तिची ही आवड प्रशिक्षक शर्मा यांच्या लक्षात आली आणि त्यांनी तिला खेळाचे प्राथमिक धडे दिले. सध्या तनिष्का प्रशिक्षक सौरभ अरोरा आणि दीपक बत्रा यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या खेळाला अधिक धार देत आहे. तिचे वडील भूषण गर्ग आणि आई मीनू गर्ग तिच्या प्रत्येक गरजेकडे बारकाईने लक्ष देतात. तिच्या या प्रवासात बठिंडा येथील सिल्व्हर ओक्स स्कूलचेही मोठे सहकार्य लाभले आहे. फिडे रेटिंग मिळविण्यासाठी, खेळाडूला फिडे-रेटेड स्पर्धांमध्ये भाग घेणे आणि रेटेड प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध विशिष्ट पातळीची कामगिरी साध्य करणे आवश्यक आहे. विशेषतः, एका अनरेटेड खेळाडूने अशा खेळाडूंविरुद्ध किमान पाच गेम खेळले पाहिजेत ज्यांच्याकडे आधीच फिडे रेटिंग आहे आणि त्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध किमान अर्धा गुण मिळवला पाहिजे . सुरुवातीच्या रेटिंग गणनेत प्रतिस्पर्ध्यांचे सरासरी रेटिंग देखील भूमिका बजावते.

## शार्दुलकडे नेतृत्व

**मुंबई :** आगामी दुलीप करंडक स्पर्धेसाठी पश्चिम विभागाने १५ सदस्यीस संघाची घोषणा केली असून, संघाच्या नेतृत्वाची धुरा शार्दुल ठाकूरच्या खांद्यावर सोपवण्यात आली आहे. वांद्रे कुर्ला संकुलातील एमसीएच्या शरद पवार इनडोअर क्रिकेट अकादमीमध्ये झालेल्या बैठकीनंतर ही घोषणा करण्यात आली. पश्चिम विभागाच्या या संघात मुंबईचे ७, गुजरातचे ४, महाराष्ट्र आणि सौराष्ट्रचे प्रत्येकी २ खेळाडू आहेत. ठाकूरसह संघात यशस्वी जैसवाल, श्रेयस अय्यर आणि सरफराज खान यांचाही समावेश करण्यात आला आहे.शार्दुल ठाकूर (कर्णधार), यशस्वी जैसवाल, आर्या देसाई, हार्विक देसाई, श्रेयस अय्यर, सरफराज खान, ऋतुराज गायकवाड, जयमीत पटेल, मनन हिंगराजिया, सौरभ नवले, शम्स मुलानी, तनुश कोटियन, धर्मेंद्र जाडेजा, तुषार देशपांडे आणि अर्जन नागवासवाला संघात असणार आहेत.

## ग्रीको-रोमन कुस्तीमध्ये हरदीप जगज्जेता




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या हरदीपने १७ वर्षाखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपदस्पर्धेत इतिहास घडविला. त्याने ग्रीको-रोमन प्रकारातील ११० किलो गटात सुवर्णपदक जिंकत जगज्जेतेपद पटकाविले.

हरदीपने अंतिम फेरीत इराणच्या यजदान रजा डेलरूज याला अटीतटीच्या सामन्यात पराभूत केले. आठव्या वर्षी पोरका झालेल्या १६ वर्षीय हरदीप हा आपल्या अप्रतिम खेळाच्या जोरावर साऱ्यांच्या नजरेत भरला. हरदीपने ग्रीको-रोमन प्रकारात ११० किलो वजनी गटात ०-२ ने पिछाडीवर असतानाही इराणच्या यजदान डेलरूजला ३-२ ने पराभूत करून भारतासाठी ऐतिहासिक सुवर्णपदक पटकावले. १७ वर्षांखालील गटात जगज्जेता होणारा तो पहिलाच भारतीय कुस्तीपटू ठरला.

उपांत्यपूर्व लढतीत युक्रेनच्या अनातोली नोवाचेंकोचा ९-० असा धुव्वा उडवत हरपीतने उपांत्य फेरीत धडक दिली.

## बुमरा-सिराजची 'अग्निपरीक्षा'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

जो फिट असेल तोच संघात बसेल, हे धोरण बीसीसीआय आगामी स्पर्धांसाठी आजमवणार असून, जसप्रीत बुमरा आणि मोहम्मद सिराजच्या फिटनेसवर बीसीसीआयने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे आशिया कपपूर्वी या दोन्ही गोलंदाजांना फिटनेसची अग्निपरीक्षा द्यावी लागणार आहे. त्यानंतर त्यांच्या सहभागाबाबत बीसीसीआय घोषणा करील. तसेच संघातील अन्य खेळाडूंनाही याच परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे.

नुकत्याच झालेल्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत बुमरा केवळ तीन कसोटी खेळला होता, तर सिराजने पाचही कसोटीत स्वतःचा वेगवान मारा इंग्लिश फलंदाजांना दाखवला होता.

बीसीसीआयच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ९ सप्टेंबरपासून सुरू होत असलेल्या आशिया कपपूर्वी निवड समितीची बैठक होणार आहे. त्याआधी या दोघांच्या फिटनेसचे परीक्षण केले जाणार आहे.



या एक महिन्याच्या विश्रांती कालावधीत दोघांची पूर्णपणे फिटनेस पाहिल्यानंतर त्यांच्याबद्दल निर्णय घेतला जाईल. हे दोघेही संघासाठी महत्त्वाचे असून दोघांनाही फिट करण्याचा बीसीसीआयचा मानस आहे.

आशिया कपमध्ये भरताचा सलामीचा सामना १० सप्टेंबरला यूएईविरुद्ध असेल. २८ सप्टेंबरला या स्पर्धेचा फैसला लागणार असून त्यानंतर पाकिस्तानविरुद्ध क्रिकेटयुद्ध पेटणार आहे. ही स्पर्धा टी-२० फॉरमॅटमध्ये खेळविली जाणार आहे. त्यानंतर ऑक्टोबरमध्ये वेस्ट इंडीजविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेला सुरुवात होईल. त्यामुळे खेळाडूंच्या फिटनेसबाबत कोणताही धोका न पत्करता वर्पलोड मॅनेजमेंटची बीसीसीआय अंमलबजावणी करणार आहे.

# दुलीप ट्रॉफी २०२५ वेळापत्रक जाहीर

### सहा विभागांत होणार स्पर्धा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**


भारतीय घरगुती (डोमेस्टिक) क्रिकेटमधील प्रतिष्ठित स्पर्धा दुलीप ट्रॉफी २०२५ साठी संघांची घोषणा झाली आहे. दुलीप ट्रॉफी ही भारतातील एक घरगुती प्रथम श्रेणी क्रिकेट स्पर्धा आहे. माजी क्रिकेटपटू दुलीपसिंहजी यांच्या नावावरून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. १९६१-६२ मध्ये झालेल्या पहिल्या स्पर्धेपासून ही स्पर्धा भारताच्या विविध भौगोलिक क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघांद्वारे खेळवली जात आहे. विभागीय स्वरूपाचे काही अपवाद आहेत, जसे की २००२-०३ स्पर्धा, जिथे रणजी ट्रॉफी गटांवर आधारित पाच संघ तयार करण्यात आले होते. २०२४-२५ च्या फॉरमॅटमध्ये अलिकडच्या आवृत्त्यांपेक्षा वेगळे बदल झाले आणि पारंपारिक झोनल संघांऐवजी चार संघांचा समावेश करण्यात आला: इंडिया अ, इंडिया ब, इंडिया क आणि इंडिया ड. ही स्पर्धा राउंड-रॉबिन पद्धतीने खेळली गेली आणि नॉकआउट स्टेज नव्हता.

**एकूण पाच सामने - २ क्वार्टर फायनल, २ सेमीफायनल आणि अंतिम सामना साऊथ आणि वेस्ट झोनला थेट सेमीफायनलमध्ये प्रवेश**

राउंड-रॉबिन स्टेजच्या शेवटी सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या संघाने स्पर्धा जिंकली. राष्ट्रीय निवडकर्त्यांनी निवडलेल्या अनुभवी आणि उदयोन्मुख खेळाडूंच्या मिश्रणाने संघ बनले होते यासाठी बीसीसीआय दरवर्षी ही स्पर्धा आयोजित करते. यंदा ही स्पर्धा २८ ऑगस्ट ते ११ सप्टेंबरदरम्यान बेंगळुरूमध्ये होणार आहे. यंदा या स्पर्धेसाठी जुना फॉरमॅट परत आणण्यात आला जाणार आहे. मागीलवेळी चार संघांमध्ये सामने घेण्यात आले होते, मात्र तो प्रयोग बीसीसीआयला पसंत पडला नाही. यंदा सहा झोनल संघ स्पर्धेत उतरणार आहेत - नॉर्थ, साउथ, ईस्ट, वेस्ट, सेंट्रल आणि नॉर्थ ईस्ट झोन.

**कर्णधारांची घोषणा**

नॉर्थ झोन – शुबमन गिल
साउथ झोन – तिलक वर्मा (उपकर्णधार: मोहम्मद अजहरुद्दीन) वेस्ट झोन – शार्दुल ठाकुर, ईस्ट झोन – ईशान किशन, सेंट्रल झोन – ध्रुव जुरेल (उपकर्णधार: रजत पाटीदार – फिटनेस क्लीयरन्सनंतर),नॉर्थ ईस्ट झोन – अद्याप जाहीर नाही



**स्पर्धेचे वेळापत्रक**

- २८-३१ ऑगस्ट (क्वार्टर फायनल-१) - नॉर्थ झोन विरुद्ध ईस्ट झोन
- २८-३१ ऑगस्ट (क्वार्टर फायनल-२) - सेंट्रल झोन विरुद्ध नॉर्थ ईस्ट झोन
- ४-७ सप्टेंबर (सेमीफायनल-१) - साउथ झोन विरुद्ध ठरायचे आहे
- ४-७ सप्टेंबर (सेमीफायनल-२) - वेस्ट झोन विरुद्ध ठरायचे आहे
- ११-१५ सप्टेंबर - अंतिम सामना

### पाकिस्तानचा पत्ता होणार कट | सहा पुरुष-महिला संघाचा समावेश

# ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचे कमबॅक

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

'आयसीसी'च्या सिंगापूरमध्ये होणारया वार्षिक बैठकीत ऑलिम्पिकसाठी पात्रतेची अंतिम रूपरेषा तयार करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, क्रिकेटमध्येही 'आयओसी' प्रमाणेच पाच खंडीय पात्रता पद्धती अवलंबली जाणार आहे. या प्रस्तावानुसार, आशिया, ओशिनिया, युरोप, आफ्रिका आणि अमेरिका या पाच खंडांमधून प्रत्येकी एक संघ ऑलिम्पिकमध्ये सहभागी होईल. या प्रक्रियेच्या आधारे सध्याच्या टी-२० क्रमवारीनुसार भारत (आशिया), ऑस्ट्रेलिया (ओशिनिया), ब्रिटन (युरोप), दक्षिण आफ्रिका (आफ्रिका) हे संघ आपापल्या खंडांचे प्रतिनिधित्व करतील. अमेरिका यजमान देश म्हणून थेट प्रवेश मिळवेल. सहाव्या संघासाठी वेस्ट इंडीजचे नाव समोर येत आहे, मात्र त्यासाठी स्वतंत्र प्रक्रिया राबवली जाईल. महिला संघांची घोषणा मात्र २०२६ मध्ये होणाऱ्या टी-२० विश्व चषकानंतर केली जाईल. पाच खंडीय पात्रता प्रणालीद्वारे संघनिवड निश्चित झाली तर पाकिस्तान, न्यूझीलंड आणि श्रीलंका यांसारख्या संघांचा ऑलिम्पिकमधून बाहेर पडण्याचा धोका आहे. कारण न्यूझीलंड टी-२० क्रमवारीत ऑस्ट्रेलियाच्या मागे आहे, तर आशियाई देशांमध्ये भारत सर्वोच्च स्थानी आहे. त्यामुळे पाकिस्तान, श्रीलंका, अफगाणिस्तान यांना संधी मिळणार नाही. अहवालानुसार, न्यूझीलंड आणि पाकिस्तानने या प्रस्तावित पात्रता प्रक्रियेवर नाराजी व्यक्त केली आहे.

लॉस एंजेलिसमध्ये होणाऱ्या २०२८ च्या ऑलिम्पिक स्पर्धेत १२८ वर्षांनंतर क्रिकेटचे पुनरागमन होणार आहे. लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये कोणते सहा देश खेळणार हे अद्यापि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (आयओसी) यांनी जाहीर केलेले नाही. शिवाय ऑलिम्पिक २०२८ साठी पात्रतेचे निकषही स्पष्ट करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे क्रिकेटसारखा ऐतिहासिक खेळ कोणत्या ६ संघांसह ऑलिम्पिकमध्ये दिसणार, याबाबत अजूनही अनिश्चितता आहे.

**१२८ वर्षांनंतर क्रिकेटचे पुनरागमन**

या स्पर्धेत केवळ ६ पुरुष आणि ६ महिला संघांना सहभागी होता येईल, हेही स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र या ऑलिम्पिकमध्ये पाकिस्तान, न्यूझीलंड व श्रीलंका आदी मोठ्या संघांचा पत्ता कट होण्याची शक्यता बळावली आहे.

## राष्ट्रीय उपकनिष्ठ बॉक्सिंग स्पर्धा

**नवी दिल्ली :** ग्रेटर नॉयडामध्ये सात ते १३ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या उपकनिष्ठ १५ वर्षांखालील राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत एकूण ७०० हून अधिक बॉक्सिंगपटू सहभागी होणार असल्याची माहिती भारतीय बॉक्सिंग महासंघाने गुरुवारी दिली. या स्पर्धेत १५ वजनी गटात खेळाडू सहभाग नोंदवतील. राष्ट्रीय उपकनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेपूर्वी या वर्षाच्या सुरुवातीला पुरुष, महिला आणि कनिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बॉक्सिंगपटू जागतिक बॉक्सिंगच्या तांत्रिक नियमांनुसार सामने खेळतील. यामध्ये दीड मिनिटाच्या तीन फेऱ्या असतील आणि प्रत्येक फेरी दरम्यान एका मिनिटाची विश्रांती असेल. स्पर्धेत दहा गुणांच्या प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे.


# परिभ्रमण का जाणवत नाही?

माहिती असावे

उर्मिला राजोपाध्ये

तुम्ही मित्र-मैत्रिणींसोबत गोल गोल फिरला किंवा एकमेकांचे हात धरून वेगाने गिरक्या घेतल्या तर काय होते बरं? अगदी बरोबर... आपल्याला चक्कर येऊ लागते. पण तुम्हाला माहिती आहे का की आपण राहतो ती पृथ्वी सूर्याभोवती सुमारे १०० मैल प्रति तास वेगाने फिरत आहे. पण इतक्या वेगाने फिरल्यानंतरही आपल्याला ते कळत नाही. दुसरीकडे, कमी वेगाने काही सेकंद गोल गोल फिरवल्यानंतरही आपल्याला चक्कर येऊ लागते. म्हणूनच पृथ्वीचे फिरणे आपल्याला का कळत नाही हे जाणून घ्यायला हवे.

मुलांनो, आपल्याला पृथ्वीचा वेग जाणवत नाही कारण आपण आणि सभोवतालच्या सर्व गोष्टी एकाच वेगाने फिरत आहोत. म्हणजेच चालत्या ट्रेनमध्ये बसणाऱ्या प्रवाशाला बाहेर पाहेपर्यंत ट्रेनचा वेग कळत नाही, त्याचप्रमाणे पृथ्वीवर आपण देखील त्याच वेगाने फिरत



असल्यामुळे काहीही जाणवत नाही.

दुसरे म्हणजे पृथ्वीची गुरुत्वाकर्षण शक्ती आपल्याला पृष्ठभागावर बांधून ठेवते. पृथ्वी अचानक थांबली तर आपण सर्वजण त्याच वेगाने पुढे जाऊ, जसे एखादी कार अचानक थांबते आणि प्रवाशांना धक्का बसतो. परंतु पृथ्वी एका स्थिर वेगाने फिरत असल्याने आपल्याला कोणताही धक्का किंवा बदल जाणवत नाही.

त्याबरोबर पृथ्वीचा आकार प्रचंड असल्यामुळेही तिचा परिभ्रमण वेग मंद वाटतो. म्हणजेच हा वेग ताशी १००० मैल असला तरी तो एका मोठ्या गोलात पसरलेला असल्याने, कोनीय वेग कमी आहे. पृथ्वीचे वातावरण देखील त्याच वेगाने फिरते, म्हणूनच आपल्याला त्याचा वेग जाणवत नाही. वातावरण पृथ्वीसोबत फिरले नसते तर आपल्याला सतत भयंकर वादळी वारे जाणवले असते. मानवी शरीर स्थिरतेसाठी बनलेले आहे. आपल्या कानातील संतुलन राखणारा भाग पृथ्वीच्या गतीशी जुळवून घेतो.

# झाडाच्या जतनासाठी...

जागरुक व्हा

दोस्तांनो, सध्या मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होताना दिसते. झाडं तोडल्यामुळे पृथ्वीवरचं तापमान वाढत चाललं आहे. प्रदूषणाचा प्रश्न आ वासून उभा राहिला आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना मास्क घालून फिरावं लागत आहे. घरांमध्ये हवा शुद्धिकरण यंत्रं बसवली जात आहेत. मात्र झाडं हा वातावरण शुद्ध करणारा नैसर्गिक स्रोत आहे. म्हणूनच काही देशांमध्ये हा हरित ठेवा टिकवून ठेवला जातो. इंग्लंडमधल्या लिव्हरपूलमध्ये एक हजार वर्षांपूर्वीचं ओकचं झाड आहे. हे झाड जपून ठेवण्यासाठी बरेच प्रयत्न केले जात आहेत. हा ओक वृक्ष अजून बरीच वर्षं जगावा यासाठी निधी गोळा करण्यात आला आहे. या झाडावर बरेच पैसे खर्च होत आहेत.

युरोपमध्ये अनोख्या स्पर्धेचं आयोजन केलं जात आहे. या स्पर्धेत झाडं सहभागी होतात. यापैकी एका झाडाला 'ट्री ऑफ द ईयर' हा पुरस्कार दिला जातो. २०२० मध्ये होणाऱ्या 'युरोपियन ट्री ऑफ द ईयर' स्पर्धेत हे ओकचं झाड सहभागी झालं होतं. 'ट्री ऑफ द ईयर' ठरण्यासाठी या झाडाला बरीच मतं मिळणं गरजेचं आहे. ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या



झाडांना या स्पर्धेत सहभागी करून घेतलं जातं. लिव्हरपूलमधला हा ओक वृक्ष ऐतिहासिक ठेवा आहे. म्हणूनच त्याचं जतन करण्यासाठी इथलं प्रशासन बरीच मेहनत करत आहे.




# असा आहे पृथ्वीचा शेजारी

जाणून घ्या

वीणा देशमुख

दोस्तांनो, आपल्या सूर्यमालेतला लाल रंगाचा ग्रह म्हणजे मंगळ. या मंगळाबद्दल पृथ्वीवासीयांना प्रचंड कुतूहल आहे. मंगळावर जीवसृष्टी आहे का, याचा शोध लावला जात आहे. भारताच्या इस्रो या अंतराळ संशोधन संस्थेसह अमेरिकेची नासा ही संस्थाही मंगळाच्या पृष्ठभागाचा अभ्यास करत आहे. तुम्हा लहानग्यांचा बालदिन असतो. त्याचप्रमाणे मंगळाचाही खास दिवस आहे. या दिवसाला 'रेड प्लॅनेट डे' असं म्हटलं जातं. २८ नोव्हेंबर हा दिवस 'रेड प्लॅनेट डे' म्हणून पाळला जातो. २८ नोव्हेंबर १९६४ या दिवशी मॅरिनर नावाचं अंतराळयान आकाशात झेपावलं. याच कारणामुळे २८ नोव्हेंबर हा दिवस रेड प्लॅनेट डे म्हणून साजरा होऊ लागला. मंगळाचा पृष्ठभाग खडकाळ आहे. लाल रंगामुळे मंगळाला रेड प्लॅनेट म्हटलं जातं. 'रेड प्लॅनेट डे'ला तुम्ही बरंच काही करू शकता. रात्री निरभ्र आकाशाकडे डोळे लावून बसा. तुम्हाला लाल रंगाचा हा ग्रह म्हणजे मंगळ दिसेल. हे शक्य नसेल तर मंगळाबाबत माहिती मिळवा. अंतराळाची माहिती देणारी पुस्तकं वाचा. इंटरनेटवरही तुम्हाला भरपूर माहिती मिळू शकते. मंगळ हा सूर्यमालेतला चौथ्या क्रमांकाचा ग्रह. म्हणजेच पृथ्वीचा शेजारी आहे. त्यामुळे मंगळावर जीवसृष्टी असेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.




# नकारात्मकता घालवण्यासाठी...

लाईफस्टाईल

आरती देशपांडे

मुलांनो, विविध कामांसाठी शरीराला ऊर्जेची गरज असते. आपण खात असलेल्या अन्नपदार्थांमुळे शरीराला ऊर्जा मिळते. नियमित व्यायामामुळे आपण तंदुरुस्त होतो. ही असते शारीरिक तंदुरुस्ती. मात्र आपले विचार, भावना आणि लोकांशी साधला जाणारा संवाद आपल्या सर्वांगिण आरोग्यावर परिणाम करत असतो. आपल्या आसपास बरीच नकारात्मकता असते. लोक नकारात्मक विचार व्यक्त करत असतात. मात्र या सगळ्यापासून स्वत:ला लांब ठेवणं खूप गरजचेचं असतं. यासाठी



नेमकं काय करता येईल? जाणून घेऊ.

✻ सतत नकारात्मक बोलणाऱ्या, इतरांचा अपमान करणाऱ्या, आयुष्याबद्दल तक्रार करणाऱ्या माणसांपासून लांब रहा. स्वत:च काही सीमारेषा आखा. तुमच्याकडे करण्यासारखं बरंच काही आहे हे लक्षात ठेवा. या नकारात्मकतेच्या जाळ्यात अडकू नका.

✻ तुम्हाला प्रोत्साहन देणारा एखादा मंत्र तयार करा. तुमच्या आसपास बरंच काही चुकीचं घडत असतं. पण हे इतरांचे विचार आहेत; माझे नाहीत, मला खूप पुढे जायचं आहे असं घोकत रहा.

✻ तुमच्या विचारशक्तीला चालना द्या. तुम्ही पांढऱ्या आणि निळ्या रंगाच्या फुग्यामध्ये बसला आहात असा विचार करा. आता दुसऱ्यांचे नकारात्मक शब्द, विचार या फुग्याला आपटून पुन्हा त्यांच्याकडेच जात आहेत. या विचारांचा तुमच्यावर काहीच प्रभाव पडत नाही, असं समजा. यामुळे इतरांच्या विचारांचा तुमच्यावर काहीच प्रभाव पडणार नाही.


✻ आपल्या घरात किंवा खोलीत बराच कचरा पडलेला असतो. काही वस्तू उगाचच ठेवलेल्या असतात. यामुळे नकारात्मकता वाढत जाते. यासाठी तुमची खोली वेळावेळी आवरा. स्वत:ला ही सवय लावून घ्या. खोलीत उगाचच वस्तूंची गर्दी करू नका. यामुळे तुम्हालाही प्रसन्न वाटेल.

# ऑनलाईन मैत्र टिकवण्यासाठी...

टेक नॉलेज

मुलांनो; तुम्ही फेसबुक, इन्स्टाग्रामसारख्या सोशल मीडिया ॲप्सचा वापर करत असाल. यावर तुमचे बरेच फ्रेंड्स असतील. पण काही चुकांमुळे तुमच्या मित्रांची संख्या कमी होऊ शकते.

✻ अनोळखी लोकांच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका. हे लोक तुमच्या मित्रांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवू शकतात. यामुळे काही लोक तुम्हाला अनफॉलो करू शकतात.



✻ सोशल साईटवरून मीम्स शेअर करतात. पण या मीम्सचा अनेकांना कंटाळा येतो. त्याऐवजी चांगली माहिती शेअर करा. यामुळे तुमचे फ्रेंड्स टिकून राहतील. शिवाय त्यांची संख्याही वाढेल.

✻ सोशल साईट्सवरून वेगवेगळ्या गेम्सच्या रिक्वेस्ट पाठवल्या जातात. पण तुमच्या फ्रेंड्स लीस्टमधला प्रत्येकजण हे गेम्स खेळत असेल असं नाही. अशा रिक्वेस्टना अनेकजण वैतागतात. त्यामुळे शक्यतो अशा रिक्वेस्ट पाठवू नका. तुमची वैयक्तिक माहिती सतत शेअर करू नका. याचा इतरांना कंटाळा येऊ शकतो. तुम्हाला अनफॉलो करू शकतात.

# तमिळनाडूची शान

सफर शहरांची

कोईंबतूरला दक्षिणेचं मँचेस्टर म्हटलं जातं. कोईंबतूर हे तमिळनाडूमधलं तिसऱ्या क्रमांकाचं मोठं शहर आहे. नोय्यल नदीच्या किनारी वसलेलं हे शहर निलगिरी पर्वताच्या पायथ्याशी आहे. इथली स्थानिक देवता कोनियाम्मनच्या नावावरून या शहराला कोईंबतूर हे नाव मिळालं. बंगलोर, पुणे या शहरांप्रमाणेच कोईंबतूर हे आयटी हब बनून गेलं आहे. हे वस्त्रोद्योगाचं मोठं केंद्र आहे. इतकंच नाही तर इथे बरीच इंजिनिअरींग महाविद्यायलं आहेत. त्यामुळे कोईंबतूरला शिक्षणाचं माहेरघर म्हटलं जातं. तमिळनाडूच्या जडणघडणीत कोईंबतूरचा मोठा वाटा आहे. या शहराच्या आसपास बरेच धबधबे आहेत. सिरुवनी हा इथला प्रसिद्ध धबधबा आहे. कोईंबतूरची लोकसंख्या २.४ दशलक्ष इतकी आहे. उटी, कुन्नूर, वालपराईसारखी पर्यटनस्थळं कोईंबतूरपासून हाकेच्या अंतरावर आहेत. त्यामुळे या शहरात पर्यटकांची गर्दी झालेली असते.



# वडा होतो कुरकुरीत

वाचा तर खरं

पंकजा देव

गरम सांभारात बुडवलेला कुरकुरीत वडा... अहाहा! विचार केला तरी तोंडाला पाणी सुटते, नाही का? मुलांनो, हा फक्त एक चविष्ट नाश्ता नाही तर दक्षिण भारताची ओळखही आहे. तुम्हीही या पदार्थाचा असंख्य वेळा आस्वाद घेतला असेल. पण मेदूवड्याच्या मध्यभागी गोल छिद्र का असते हे तुम्हाला माहिती आहे का? मित्रांनो, हे फक्त डिश सुंदर दिसण्यासाठी नाही हे प्रथम जाणून




घ्या.

वड्याचे पीठ खूप जाड असते. ते छिद्राशिवाय गोल बनवले तर बाहेरील थर लवकर शिजेल आणि कुरकुरीत होईल, परंतु असे केल्यास आतील भाग कच्चा राहतो. तो नीट शिजत नाही. छिद्रामुळे गरम तेल वड्याच्या आतील पृष्ठभागावर सहजपणे पोहोचू शकत असल्यामुळे वडा आतून आणि बाहेरून समान पद्धतीने शिजतो.

वडा तेलात तळला जातो तेव्हा छिद्रांमुळे तो सर्व बाजूंनी कुरकुरीत होतो. आतूनही तेलाच्या संपर्कामुळे वड्याची पोत खूप कुरकुरीत होते. छिद्र नसतील तर वडा बाहेरून कुरकुरीत असला तरी आतून मऊ राहू शकतो. तसेच तळल्यानंतर वडा तेलातून बाहेर काढला जातो. असे करताना छिद्रांमुळे अतिरिक्त तेल सहजपणे बाहेर पडते आणि वडा कमी तेलकट होतो. खाण्यास हलकाही वाटतो. वडा चिकट्ही होत नाही.

वड्यातील छिद्राचा आणखी एक फायदा म्हणजे तुम्ही सांभार किंवा चटणीमध्ये वडा बुडवता तेव्हा सांभार आणि चटणीची चव छिद्रातून वड्याच्या आत पोहोचते आणि ही डिश अधिक रुचकर लागते.




# बायोकेमिकल इंजिनिअरींगचा विचार करा

कोण होणार?

इंजिनिअरींगच्या विविध शाखा आहेत. त्यापैकी एक म्हणजे बायोकेमिकल इंजिनिअरींग. केमिकल इंजिनिअरींग, मायक्रोबायोलॉजी आणि बायोकेमिस्ट्रीच्या अभ्यासासाठी इंजिनिअरींगची ही शाखा तयार करण्यात आली आहे. बायोकेमिकल इंजिनिअर्स सेल्स व्हायरस, प्रोटिन्स तसंच इतर बायप्रोडक्टसच्या विकासासाठी, यांच्या विकासात येणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्नशील असतात. बायोकेमिकल इंजिनिअरींगअंतर्गत तुम्ही बायोकेमिस्ट्री, बायो आंत्रप्रिनरशीप, बायो प्रोसेस, एन्व्हायर्न्मेंटल स्टडीजसारख्या विविध विषयांचा अभ्यास करू शकता. या शाखेत प्रवेश घेण्यासाठी तुम्हाला विविध प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. पदवी मिळवल्यानंतर तुम्ही मास्टर्स तसंच पीएचडीही करू शकता.

बायोकेमिकल इंजिनिअर्स रंग, बायो फ्युअल, अल्कोहोल, स्टेरॉइड्स, एंझाइम्स, बायो फर्टिलायझर्सची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांमध्ये काम करतात.

ठिपके जुळवा



## दोस्त हे मस्त

### प्लॅटिपस पेरी



छोट्यांनो, प्लॅटिपस पेरी हा अनोखा प्राणी आहे. त्याची चोच बदकासारखी असते. त्याचे पायही विचित्र असतात. हा प्राणी दिसायला खूपच विचित्र असतो. प्लॅटिपस पेरी नर विषारी असतात. हा प्राणी जमिनीसोबतच पाण्यातही रहातो. या प्राण्यांना पोहायला खूप आवडतं. पायांच्या विशिष्ट रचनेमुळे त्यांना पाण्यात पोहणं सोपं होतं. हा प्राणी पाण्यात शिकार करतो. ऑस्ट्रेलियाच्या २० सेंटच्या नाण्यावर प्लॅटिपसचं पेरीचं चित्र आहे.

## खादाडी


### मस्त स्ट्रॉबेरी क्रॅकर

दोस्तांनो, तुम्हाला स्ट्रॉबेरी आवडत असेल. या आंबटगोड फळात भरपूर पोषक घटक असतात. म्हणूनच तुम्ही स्ट्रॉबेरीपासून छान छान पदार्थ बनवू शकता. स्ट्रॉबेरी क्रॅकर्स हा पदार्थ खूप मस्त लागेल. स्ट्रॉबेरी क्रॅकर्स बनवण्यासाठी दोन स्ट्रॉबेरी, दोन मोठ्या आकाराची बिस्किटं आणि दोन चमचे फ्रेश क्रीम असं साहित्य घ्या. स्ट्रॉबेरीचे तुकडे करा. त्यात फ्रेश क्रीम घाला. आता हे मिश्रण एका बिस्किटावर पसरा. त्यावर दुसरं बिस्किट ठेवा. तुमचं स्ट्रॉबेरी क्रॅकर तयार आहे!



## स्टडी टिप्स

### उद्दिष्ट ठरवा



छोट्यांनो, कोणत्याही उद्दिष्टाशिवाय केलेला अभ्यास लक्षात रहात नाही. त्यामुळे एकाच दिवशी वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करण्यापेक्षा एका विषयाची निवड करून तयारीला लागा. एका विषयाचा किती अभ्यास करायचा हे ठरवा. एक उद्दिष्ट ठरवा. आज दोन धडे पूर्ण करायचे आहेत, असं ठरवून अभ्यासाला लागा. यामुळे हे दोन धडे तुमच्या नीट लक्षात राहतील.

## योगा टाईम

### लाभ त्रिकोणासनाचे



योगासनांमुळे ताणतणाव कमी व्हायला मदत होते. त्रिकोणासन हे असंच एक आसन आहे. यामुळे पाठीचा कणा बळकट होतो. विविध दुखणी कमी होतात. त्रिकोणासन केल्याने वजनही कमी होतं. हे आसन थोडं कठीण असलं तरी याचे बरेच लाभ आहेत. त्यामुळे त्रिकोणासन नियमितपणे करायला हवं.




रंगबहार

# अभिनेता, निर्माता मा. भगवान पालव
# एक शापित गंधर्व

शरद कोरडे



भगवान आबाजी पालव एका अष्टपैलू व हरहुन्नरी पैलवानी व्यक्तिमत्त्वाचा जन्म १ ऑगस्ट १९१३ मध्ये महाराष्ट्रातल्या अमरावती शहरात झाला. त्यांचे वडील आबाजी पालव हे मुंबईतील कॉटन मिलमध्ये कामगार म्हणून काम करीत होते. गिरणगावातील कामगार वस्तीमध्ये ते राहत असले तरी त्यांना चित्रपट पहायची खूप हौस होती. वडिलांबरोबरच चित्रपट पाहत असतानाच भगवान यांना लहानपणापासूनच चित्रपटाचे वेड लागले. परळच्या कामगार वस्तीच्या सभोवतालच्या दादर, परळ, ग्रँटरोड या परिसरातील चित्रपटगृहात जाऊन ते चित्रपट पाहत असत. या चित्रपटांचा आस्वाद घेत असतानाच त्यांनाही आपण चित्रपटात काम करावे असे वाटू लागले. निरनिराळ्या स्टुडिओत जाऊन ते शूटींग पाहत असत. तो मूक चित्रपटांचा जमाना होता. निर्माते, दिग्दर्शकांना भेटून त्यांनी आपणासही चित्रपटांत काम करायचे आहे अशी विनंती केली. व्यायामाने कमावलेली शरीरयष्टी असल्याने त्यांनी या रांगड्या तरूणाला चित्रपटात छोट्या छोट्या भूमिका द्यायला सुरूवात केली. मूक चित्रपटात त्यावेळी सामाजिक चित्रपट कमी असत. पौराणिक व स्टंटपट अधिक असल्याने त्यात मा. भगवान शोभून दिसत. अशी कामे करीत असतानाच त्यांनी चित्रपट दिग्दर्शन व निर्मिती याबाबत बारकाईने अभ्यास केला. निर्माते दिग्दर्शक पी.जी. पवार व संगीतकार हनुमान प्रसाद त्यावेळी परळ इथे राहत होते. त्यांनी व ललिता पवार या दोघांनी मिळून 'साऊंड ऑफ म्युझिक' या चित्रपटाची निर्मिती बंगलोरला जाऊन केली होती. त्या चित्रपटाची नायिका ललिता पवार याच होत्या. मा. भगवान यांनी पी.जी. पवार यांची भेट घेतल्यावर त्यांनी मा. भगवान यांना आपल्या चित्रपटांत भूमिका द्यायला सुरूवात केली. मा. भगवान यांनी 'मनमानी' 'नारी' व 'आशिर्वाद' या सन १९३५ ते १९४० पर्यंतच्या चित्रपटात ललिता पवार यांच्यासोबत नायक व सहनायकाच्या भूमिका केल्या. सन १९४२ सालच्या 'टारझन' या चित्रपटात मा. भगवान यांनी ललिता पवार यांच्यासोबत सहनायकाची भूमिका केली. या चित्रपटाचे नायक होते स्टंटमन चंद्रराव कदम. त्यानंतर १९४२ च्या 'हिम्मत-ए-मर्दा' या जी.पी. पवार दिग्दर्शित चित्रपटात काम केले. त्यानंतर १९४२ च्या 'जंग-ए-आझादी' मध्ये ललिता पवार सोबत नायकाचे काम केले. या चित्रपटात धाडसी नायिका उघड्यावर नदीत आंबोळ करते असे दृश्य होते. नायक मा. भगवान हे पाहून चिडून नायिकेच्या थोबाडीत मारते असा प्रसंग होता. त्यावेळी भगवान यांनी भीत भीत हळू त्यांच्या थोबाडीत मारली; परंतु हे दृश्य खरे वाटावे म्हणून ललिता पवार यांनी त्यांना प्रत्यक्षात खरीखुरी थोबाडीत मारायला सांगितली. नंतर मा. भगवान यांनी त्वेषाने जोरदार थोबाडीत मारल्यामुळे ललिता पवार खाली कोसळल्या. त्यांच्या डोळ्याजवळील रक्तवाहिनी फुटली आणि त्यांच्या चेहऱ्यास पॅरिलिसीस झाला. चित्रपटाचे काम सुरू असतानाच त्या डोळ्यावर वैद्यकीय उपचार घेत होत्या. डॉक्टरांकडून चुकीचे उपचार झाल्याने त्यांची प्रकृती आणखीनच बिघडली. तीन वर्षे त्या उपचार घेत होत्या व त्या काळात त्या चित्रपटामध्ये कामही करू शकत नव्हत्या. आर्थिक अडचणीमुळे त्यांना स्वतःची गाडी विकावी लागली. पुढे प्रकृती सुधारली तरीही डोळ्याचे वैगुण्य तसेच राहिले. आपणामुळे ललिताबाईंना हे दुःख सहन करावे लागले याचे मा. भगवान यांना खूप वाईट वाटले व त्यांनी अनेकदा त्यांची माफी मागितली.

मा. भगवान यांनी १९४९ मध्ये 'मोदी बंगला' या हॉरर फिल्मचे दिग्दर्शन केले व त्यात प्रमुख भूमिकाही केली. हा चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिला भयपट मानला जातो. या चित्रपटाची निर्मिती 'जागृती फिल्म्स'द्वारे करण्यात आली होती. याच चित्रपटानंतर मा. भगवान यांनी चेंबूर येथील 'जागृती स्टुडिओ' विकत घेतला. त्यानंतर त्यांनी 'बहाद्दूर', 'किसान' या हिट सिनेमात काम केले. १९५१ मध्ये मा. भगवान यांनी राजकपूर बरोबर चर्चा केली, तेव्हा राजकपूरने त्यांना सामाजिक विषयावरील व मेलेडीसाँग घेऊन नृत्याला प्राधान्य देणारा चित्रपट निर्माण करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे मा. भगवान यांनी 'अलबेला' चित्रपटाची तयारी केली. या चित्रपटाची कथा पटकथा मा. भगवान यांची होती व दिग्दर्शनही त्यांनीच केले होते. या चित्रपटात स्वतः भगवानदादा, गीताबाली, सुंदर, बद्रीप्रसाद, प्रतिमादेवी, विमला, मारूती, शाम आदी कलाकार होते. या चित्रपटात एका गरीब तरूणाची ज्याला आपण मोठे कलाकार होणार आहोत अशी स्वप्ने पाहणारा छोट्या कलाकाराचे जीवन रेखाटण्यात आले आहे, ज्याचे वडील नोकरीतून निवृत्त झाले आहेत. मोठ्या भावाचे लग्न झाले आहे, पण तोही आर्थिक विवंचनेत आहे, धाकट्या बहिणीचे लग्न ठरले आहे, पण लग्नाला पैसे नाहीत; अशा परिस्थितीत मोठा कलाकार बनून पैसे मिळवीन मगच घरी येईन असे म्हणून तरूण प्यारेलाल घराबाहेर पडतो. त्याला येणारे विचित्र अनुभव, अपमान अशा अवस्थेत तो कलाकार बनतो, आशा नामक एक नर्तकी त्याला भेटते. दोघे मिळून संघर्ष करतात व नावलौकिक मिळवतात. प्यारे घरी नियमित पैसे पाठवतो. पण ते त्यांना मिळत नाहीत. वडील व धाकटी बहीण घरापासून दुरावतात व रस्त्यावर येतात. अनंत अडचणीनंतर प्यारे व कुटूंबाची भेट होते. असे कथानक असलेला हा चित्रपट १९५१ मध्ये प्रथम मुंबईत प्रदर्शित झाला, पण अपेक्षेप्रमाणे चालला नाही. चित्रपटासाठी झालेला खर्च वसूल झाला नाही. शेवटी मा. भगवान यांनी हा चित्रपट मराठी निर्माते रणजीत बुधकर यांना विकला. त्यांनी तो काही काळाने पुनः प्रदर्शित केला व त्यावेळी त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला, त्यातील सर्व गाणी गाजली. सी. रामचंद्र यांचे संगीताने सर्वांना मोहित केले आणि रणजित बुधकरांना अपेक्षेपेक्षा अधिक नफा झाला. याच्या उलट मा. भगवान यांना आपला जुहूचा बंगला व गाड्या विकाव्या लागल्या. इतर चित्रसंस्थांच्या चित्रपटात त्यांनी कामे करण्यास सुरूवात केली. त्यात राजकपूर-नर्गिस यांच्या 'चोरीचोरी'मध्ये त्यांना बऱ्यापैकी भूमिका मिळाली. त्यानंतर त्यांनी 'झमेला' व 'भागम् भाग' या चित्रपटांची निर्मिती केली पण फार यश त्यांच्या पदरी पडले नाही. शेवटचा जुगार म्हणून त्यांनी किशोरकुमारला घेऊन एका विनोदी चित्रपटाची निर्मिती सुरू केली. हा सिनेमा यशस्वी झाल्यास आपले सारे अपयश धुवून निघेल व आपली आर्थिक बाजू भक्कम होईल या अपेक्षेने मा. भगवान यांनी फायनांसरांच्या मदतीने चित्रीकरण सुरू केली, पण किशोरकुमारच्या विक्षिप्त स्वभावामुळे व धरसोड वृत्तीमुळे तसेच अनपेक्षित मागण्यांमुळे भगवान यांनी हा चित्रपट थांबवायला लागला व भगवानला प्रचंड तोटा सहन करावा लागला. जुहू बंगल्यात राहणारे मा. भगवान दादर पूर्वेला एका चाळीत रहायला आले व अखेरपर्यंत चित्रपटसृष्टीपासून दूर झाले.

मा. भगवान यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीत एकूण ४८ चित्रपटांची निर्मिती केली व एकूण ३०० चित्रपटांत कामे केली. तरीही फार मोठे दैदिप्यमान यश वा पुरस्कार त्यांना मिळाले नाहीत. मात्र त्यांच्या नृत्याची शैली काही नवोदित कलाकारांनी अंगिकारून मोठे यश मिळविले. त्यात अमिताभ बच्चन, मिथुन चक्रवर्ती व गोविंदा यांचा समावेश आहे. २ फेब्रुवारी २००२ मध्ये हृदयविकाराच्या धक्क्याने त्यांना मृत्यू आला व एका शापित गंधर्वांचा करूण अंत झाला. ●●

**मोहम्मद रफी साहेबांबद्दल बोलताना असेच म्हणावे लागेल. तो बुलंद पहाडी आवाज. तो गाण्यातला गोडवा. चित्रपटात काम करत असणारा अभिनेता त्याच्या आवाजाला मॅच करणारा आवाज रफी साहेब हुबेहुबे काढायचे. शम्मी कपूर साठी त्यांचा अत्यंत रोमँटिक आवाज. राजेन्द्र कुमार साठी सॅड साँग गाताना काढलेला दर्दभरा आवाज. गाता गाता हुंदके देऊन रडणे किंवा हसणे सगळे लिलया आपल्या गाण्यातून साकार करणारे गायक म्हणजे मोहम्मद रफी. खिलौना चित्रपटातील ''खिलौना जानकर तूम तो मेरा दिल तोड जाते हो'' हे संजीवकुमार यांच्यावर चित्रित झालेले गाणे किती अप्रतिम आहे. त्यातले हूंदके स्पष्ट ऐकू येतात. पहाडी आवाज एवढा उंच स्वर लागतो. ''तुम मुझे यू भूला ना पाओगे सुनोगे गीत गुनगुनाओगे'' हे रफी साहेबांचे गाणं त्याच्या खऱ्या आयुष्यातही एक कहाणी बनून राहिले.**



# एक अद्भूत फन्कार मोहम्मद रफी

श्रीराम शेटये

तब्बल चार दशके आणि आजही भारतीय सिनेमातील कानसेनांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे पार्श्वगायक मोहंमद रफी यांचा ३१ जुलै स्मृतिदिवस....

त्यांनी हिंदी भाषा, उर्दू, पंजाबी, मराठी आणि तेलुगूभाषांमधून गाणी गायली, पण ते आपल्या हिंदी भाषा चित्रपटांच्या (किंवा बॉलिवुड च्या) गाण्यांसाठी अतिशय प्रसिद्ध आहेत. त्यांची गाणी भारतात तसेच भारताच्या बाहेर स्थायिक असलेल्या भारतीयांमध्ये लोकप्रिय आहेत. मुकेश, किशोर कुमार, मन्ना डे, महेंद्र कपूर, हेमंत कुमार मुखोपाध्याय आणि तलत मेहमूद यांच्या बरोबर ते हिंदी चित्रपटांच्या १९५० ते १९८० च्या दशकांमधल्या प्रमुख पार्श्वगायकांपैकी एक होते.

हिंदी सिनेमांत असा प्रसंग अनेक वेळा बघायला मिळतो. अर्थात जुन्या सिनेमांबद्दल बोलतोय. (म्हणजे अगदी इसवीसनापूर्वी नव्हे पण तरीही त्या मानाने जुन्याच!) सध्याच्या नाही. म्हणजे असं असतं की कोणाच्या (हिरोईन किंवा तिची मैत्रीण) तरी घरी पार्टी असते .छान वातावरण असतं. अर्थातच पार्टीला साजेसे कपडे असतात. उंची खाणं/पिणं... हसणं-खिदळणं... कधीकधी नाचणं देखील! मग अचानक सगळ्यांना शांत बसण्याची सूचना दिली जाते आणि कोणीतरी हिरोला गाणं म्हणण्याची विनंती करतं. हिरो महाशयांना या पार्टीच्या निमित्ताने एक नामी संधी मिळते - जिच्यावर मी (म्हणजे हिरोने!) एवढं नि:स्वार्थी, निस्सीम, निरतिशय वगैरे प्रेम केलं, ती कशी 'बेवफा' निघाली! हिरो गाणं सुरू करतो आणि सगळे एकदम चिडीचूप ! आधीचा सगळा तो मूड. तो माहोल... सगळं गायब... हिरो आपल्या शब्दांच्या करामतीतून सूचकपणे किंवा कधी कधी उघडपणे जी कैफियत मांडतो ती सगळे अगदी मनोभावे तल्लीन होऊन ऐकू लागतात. कोणीही त्याला थांबवत नाही- ''अरे आम्ही कशासाठी आलो आणि तू हे काय रडगाणं गातोयस?'' असं विचारतही नाही . क्वचित दोघांची एखादी कॉमन मैत्रीण सूचक हसते किंवा ती जर 'खल-प्रवृत्तीची' असेल तर तिला अगदी आनंदाच्या उकळ्याच फुटतात! हिरोला मिळवण्याच्या तिच्या मार्गातला हिरोईन नामक काटा दूर झाल्याचा तो आनंद असतो. पण हिरोचं गाणं चालू राहतं. माझ्या (म्हणजे हिरोच्या!) 'अशा प्रेमाचा तू स्वीकार का केला नाहीस ? आता या प्रेमभंगामुळे मी 'गम' मध्ये बुडून जाईन' वगैरे वगैरे.

अशा सुरुवातीला आनंदी वातावरण पण नंतर सॅड प्रसंगातील गाणी मात्र खूप छान असतात. कित्येकदा ही गाणी या पार्श्वभूमीचा विचार न करता ऐकली किंवा ती जर माहीतच नसताना ऐकली तर ती रत्नजडित खजिन्यासारखी वाटतात. अशी गाणी आधी ऐकली आणि नंतर त्याचे दृश्य स्वरूप पाहिले की केवढी निराशा होते ! याचे एक अस्सल उदाहरण तुम्हांला सांगतो - कोणे एके काळी 'हवस' नावाचा सिनेमा आला होता. अनिल धवन आणि नीतू सिंग यांचा. सध्याच्या पिढीला हे अभिनेते ओळखण्याची/ लक्षात ठेवण्यासाठी एक क्लू म्हणजे- वरूण धवनचे काका आणि ची आई ! तर त्यात एक अप्रतिम गाणं होतं - 'तेरी गलियो में ना रखेंगे कदम आज के बाद...' संगीतकार उषा खन्ना, गायक मोहम्मद रफी ! साधे सोपे शब्द, दर्दभरी चाल... संगीतही छान. तेरी गलियो में या पहिल्या ओळीच्या (आणि नंतर कडव्याच्या शेवटीही) मागे मागे जे व्हिसल ऐकू येतं ते खूप छान वाटतं. ज्या मोहंमद रफीच्या आवाजाने या गाण्यातील साध्या सरळ वाटणाऱ्या ओळींचे सोने केले आहे.

२०१३ मध्ये भारतीय हिंदी सिनेमाला १०० वर्ष पूर्ण झाली. यावेळी बीबीसी एशिया नेटवर्कने एक सर्व्हे केला होता. त्यात मोहम्मद रफींना हिंदी सिनेमासृष्टीतील एक महान आवाज म्हणून नावाजले गेले. त्यांनी गायलेले चित्रलेखा चित्रपटातले 'मन रे तू काहे न धीर धरे' या गीताला पहिले स्थान मिळाले आहे. या सर्व्हेमध्ये दुसऱ्या स्थानावर तीन गाणी होती. त्यातही रफी यांनी गायलेली दोन गाणी आहेत. १९६५ 'गाईड' चित्रपटात गायलेले 'तेरे मेरे सपने अब एक रंग है' आणि 'दिन ढल जाए हाय रात न जाए'

मोहम्मद रफी यांच्या गायकी कोणत्याही पुरस्काराला डोळ्यासमोर ठेवून केलेली नव्हती. ती मनापासून केलेली होती. ३१ जुलै १९८० ला रात्री १० वाजून ५० मिनिटांनी रफी साहेबांनी या जगाचा निरोप घेतला. जगाचा निरोप घेण्याआधी काहीतास त्यांनी लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या आसपास ह्या चित्रपटासाठी 'शाम फिर क्यो उदास है' हे गीत म्हटले होते.

मोहम्मद रफी यांच्या अंत्ययात्रेत १० हजाराहून अधिक चाहते उपस्थित होते. मुंबईत याआधी अंत्ययात्रेला एवढे लोक कधीही मुंबईत जमले नव्हते. जुहू मुस्लिम कब्रस्थानात रफी साहेबांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. पण २०१० मध्ये हे स्मारक पाडले गेले. आजही त्या ठिकाणी असलेल्या नारळाच्या झाडाला रफीसाहेबांचे स्मारक समजून त्यांचे चाहते श्रध्दांजली अर्पण करायला जातात. रफी साहेबांच्या जाण्यानंतरही झालेले सात चित्रपट अल्लाहरखा, मर्द, कुली, देशप्रेमी, नसीब, आसपास आणि हिरालाल - पन्नालाल हे त्यांना समर्पित केलेले होते. रफी साहेब एक गायक असण्यासोबतच एक चांगले व्यक्तिमत्व म्हणून चित्रपट दुनियेला परिचीत होते. त्यांच्याबाबत बोलताना लता मंगेशकर म्हणतात, 'मधुर स्वभावाचे सुरीला माणूस. माझे भाग्य आहे की, माझी बहुतेक गाणी मी त्यांच्या सोबत गायली आहेत. संगीत न समजणाऱ्या प्रेक्षकांनाही त्यांच्या गाण्यांनी कानसेन केले आहे.' रफी साहेब नेहमीच दुसऱ्याना मदत करण्यासाठी पुढे असत. त्यांनी काही संगीतकारांसाठी फुकट गाणीसुध्दा गायली आहेत. कधीही कुणाला रॉयल्टीसाठी अडवून पाहिले नाही. ७० च्या दशकात जेव्हा किशोरकुमार लोकप्रिय होत होते, त्या काळात रफी साहेबांकडे येणारी गाणी कमी होती. तरीही या महान, सहृदय गायकाने कधीही स्पर्धेच्यादृष्टीने त्याकडे पाहिले नाही.

**तेरी आवाज की शबनम से**
**बीते समय में एक आवाज आयी**

हे गाणे म्हणजे रफी यांच्या चित्रपटसंगीतातील गायकीचा परमोच्च बिंदू गाठणे काय हे रसिकांना दाखवून दिले. रफी साहेबांचा आवाज म्हणजे भक्तीगीतातील भक्ती, प्रेमगीतातील समर्पणाची भावना, विरह गीतातील विरहाची तरल भावनांचा अनुभव ऐकणाऱ्याला होत असे. स्वरातील उठाव आकाशाला गवसणी घालणारा तर आवाजाची खोली समुद्राच्या खोलीची बरोबरी करणारी. जनमानसाच्या मनामनावर कोरलेले नाव मोहम्मद रफी.

गीत म्हणतांना रफी साहेबांनी नेहमी शब्दांपेक्षा त्याच्या भावांवर अधिक लक्ष दिले. गीतातील भावना सर्वसामान्य प्रेक्षकांपर्यंत पोहचल्यानंतर गीत का नाही मनापर्यंत पोहचणार. म्हणूनच आजही रफी साहेबांची गाणी कोणत्याही पिढीतील प्रेक्षकांना आवडतात.

'मधुबन में राधिका नाचे रे', 'सर जो तेरा चकराए' यासारखी दोन टोकांवरची गाणी गातांना त्यातील भावभावनासोबतच ती ज्यांच्यावर चित्रीत होणार आहेत, त्या कलावंतांचाही विचार गायकीत करणारे रफी साहेब. चित्रपट संगीताला एका उंचीपर्यंत पोहचवणाऱ्या रफी साहेबांनी चित्रपटसंगीताविषयी आदर निर्माण करण्याचेही काम केले. शास्त्रीय संगीतावर आधारीत गाणे असो, की विदेशी संगीतावर रफी साहेबांच्या गायनाची उत्कृष्ट छाप प्रत्येक गाण्यावर यायचीच. रफी साहेबांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ ला पंजाबमधील कोटला सुल्तानसिंह गावात झाला. १४ वर्षांचे असतांनाच कुटुंबासहित लाहोरला गेले. तिथेच शास्त्रीय संगीतातील दिग्गज गायक उस्ताद बडे गुलाम अली, उस्ताद अब्दुल खान, पंडीत जीवनलाल मट्टू आणि फिरोज निजामी यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे धडे गिरवले. पंजाबी चित्रपट गुल बलोच पासून त्यांनी चित्रपट गायनाची सुरुवात केली.

या चित्रपटातील 'सोणिये नी हिरीये' हे गाणे त्यांनी जीनत बेगमसोबत गायले होते. गाण्याचे संगीतकार श्याम सुंदर होते. फिरोज निजामी या गायकीने एवढे प्रभावित झाले की, त्यांनी रफी साहेबांना लाहोर रेडीओला नोकरीलाच लावले. तिथे त्यांनी गायलेले 'यहाँ बदला वफा का बेवफाई के सिवा क्या है' हे गीत फिरोज निजामींनीच कम्पोज केलेले होते. ही गीत त्याकाळात खूप प्रसिद्ध झाले होते. हेच गीत ऐकून चित्रपट निर्माता जे.बी.वाडीया यांनी त्यांच्याच नावाचा हट्ट धरला आणि त्यांच्या 'बाजार' नावाच्या चित्रपटातील सातही गाणी त्यांनी रफीसाहेबांच्या गायकीतच सादर केली.

नौशाद आणि रफी यांचा जमाना सुरु झाला तेव्हा संगीतकार म्हणून नौशादांनी रफी साहेबांचा विस्मयकारी आवाजाचे मोहमयी रंगपटल विस्तारण्यात मोठी भूमिका केली. रफी आणि नौशाद ही जोडी सुरु झाली ती, १९४४ मधील 'हिंदुस्थान के हम है, हिंदुस्थान हमारा' या गीतापासून. त्याकाळातील युवांच्या आशा, आकांक्षा, चिंता आणि स्वप्नांना बुलंद आवाज देणारा रफी साहेबांचा आवाज हिंदुस्थानचा आवाज बनला.

१९४६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'अनमोल घडी' या चित्रपटातील गीतांनी रफी आणि नौशाद यांच्या संगीतबंध अधिकच दृढ झाला. अर्थात याला एक महत्त्वाचे कारण होते ते म्हणजे निव्यर्सनी रफी साहेब. याबाबत एक गोष्ट सांगितली जाते ती म्हणजे, एकदा नौशादनी रेकॉर्डिंग स्टुडिओच्या बाहेर तलत महमूद यांना सिगरेट पितांना पाहिले आणि या गोष्टीवरून ते खूप नाराज झाले. त्यांच्या नुकत्याच सुरु झालेल्या 'बैजू बावरा' या चित्रपटातील सगळी गीते त्यांनी रफी साहेबांना देवून त्यांच्याकडूनच सुरबध्द करवली.

नौशाद एकप्रकारे रफी साहेबांचे फॅन बनले होते. रफी साहेबांनी जगाचा निरोप घेतल्यानंतर नौशादनी रफी द लिजेंड ने त्यांना श्रध्दांजली अर्पित केली. यावेळी रफी साहेबांची स्तुती करताना ते म्हणाले, 'तेरी आवाज की शबनम से धुल जाते थे गम सारे'. त्यांचा हा विश्वास होता की, रफी साहेबांचा आवाज जीवनातील सर्व सुंदरता परावर्तीत करणारा आहे. शतकानुशतके ऐकला जाणारा आवाज आहे. 'व्हिलेज गर्ल' या चित्रपटात तर रफी साहेबांबरोबर नौशादांनी एक ड्यूट गाणे केले होते. ५० च्या दशकात नौशाद रफी साहेबांव्यतिरिक्त कोणत्याही गायकासोबत काम करत नव्हते. या दोघांनी लोकप्रिय संगीताचा वापर करून चित्रपटसृष्टीतील गीतांचे आयामच बदलून टाकले. 'बैजू बावरा' आणि 'उडनखटोला' तसेच नंतरच्या साठच्या दशकातील 'कोहिनूर', 'मेरे महबूब', 'दिल दिया दर्द लिया', 'संघर्ष' ह्या लोकप्रिय झालेल्या चित्रपटांचे संगीतकार नौशाद आणि गायक रफी ही जोडी प्रसिध्द होती. संगीतकार ओ.पी.नय्यर यांनीही रफी साहेबांच्या आवाज शम्मी कपूरकरिता 'तुमसा नही देखा', कश्मीर की कली', आणि जॉय मुखर्जीकरिता 'फिर वही दिल लाया हू' या गाण्यांसाठी वापरला. ही गाणी आजही ऐकणाऱ्या आपल्या पायावर ठेका धरायला लावतात. या व्यतिरिक्त 'मेरे सनम' आणि 'बहारें फिर भी आयेंगी' या चित्रपटात संगीतबद्ध झालेली गाणी आजही धमाल उडवत आहेत. अतुलनीय आवाज असलेल्या रफी साहेबांची प्रतिभा आता सर्वच संगीतकारांपर्यंत पोहचली होती. नौशाद साहेबांनंतर त्यांच्या आवाजाचा उपयोग संगीतकार सचिन देव बर्मन यांनीसुध्दा केला. गुरुदत्तच्या 'कागज के फुल' मधील गाणी असो किंवा नवकेतनच्या 'गाइड', 'काला बाजार' किंवा 'तेरे घर के सामने' या लोकप्रिय झालेल्या चित्रपटातील गाणी रफी साहेबांनीच गायलेली आहेत. सचिन देव बर्मनांनी संगीतबध्द केलेल्या 'प्यासा' ह्या चित्रपटातील गाणी जी रफी साहेबांनी गायली ती आजही आपली जादू टिकवून आहेत. 'गाइड' चित्रपटाच्यावेळी किशोरकुमार हे लोकप्रिय गायक होते तरीही या चित्रपटांतील गाणी गाण्यासाठी सचिनदांनी रफी साहेबांच्याच आवाजाचा वापर केला. त्यांच्या आवाजाची लोकप्रियता लोकांमध्येच नाही तर संगीतकारांमध्येच होती हे 'काला पानी' आणि 'फर्ज' या चित्रपटातील गाण्यांनी सिद्ध केले. चित्रपटसंगीतातील गझलांचे सम्राट मदनमोहन हे रफीसाहेबांच्या आवाजाला परिपूर्ण आवाज म्हणत असत. मदन मोहन संगीतकार आणि गायक रफी साहेब यांनीसुध्दा अनेक चित्रपटातून लोकप्रिय गाणी देवून चित्रपटसंगीताच्या खजिन्यात अनमोल भर टाकली आहे. 'मै यह सोचकर उसके दरचे उठा था, यह दुनिया यह महफिल, कभी न कभी, कही न कही, कोई न कोई तो आएगा, मुझे ले चलो आज फिर उसी गली में जहाँ पहले पहले ये दिल लडखडाया, चिराग दिल का जलाओ, बहु अंधेरा है' या गाण्यांमधील जादू फक्त मदनमोहनच संगीतबध्द करू शकतात आणि सूरबध्द केवळ रफीसाहेबच करु शकतात. 'लैला मजनू' या चित्रपटाच्यावेळी बहुतेक संगीतकार किशोरकुमार यांचा आवाज वापरत असतांनाही, संगीतकार मदनमोहन यांनी रफीसाहेबांनाच बोलावले. या चित्रपटातील 'तेरे दर पे आया हू' आणि 'बर्बाद ए मोहब्बत की दुआ साथ लिए जा' ही गाणी एवढी गाजली की त्या काळातल रफीसाहेबांना चित्रपटसंगीताच्या दुनियेत पुन्हा जोमाने काम करण्यास कारणीभूत ठरली. त्यानंतर मग मदनमोहन आणि रफी साहेब या जोडीचे 'हकीकत', 'शराबी', 'दुल्हन एक रात की', 'नींद हमारी ख्वाब तुम्हारे', 'नैनिहाल', 'चिराग', 'हीर राँझा', 'दस्तक', 'हसते जख्म' या चित्रपटातील गीतांनी आपली जादू जनमानसाच्या मनावर गाजविली. रफी साहेबांच्या आवाजाची जादू त्यांच्या स्पर्धक गायकांनाही जाणवली कारण 'शरारत' या चित्रपटात काम करत असताना किशोर कुमार यांनी त्यांच्या आवाजातील 'अजब है दास्ता तेरी ए जिंदगी' या गाण्यासाठी रफी साहेबांचा आवाज वापरण्याचा आग्रह धरला नसता.

सुरवातीस मोहमंद रफी यांच्या शैलीवरही जुन्या गायकांच्या शैलीचा प्रभाव दिसून येतो. (आठवा - मै जिंदगीमे हरदम रोता ही रहां हू १९४९). पण रफींच्या आयुष्यात दोन महत्वाचे संगीतकार १९५२ ते १९६० या काळात आले ते म्हणजे शंकर जय किशन व ओ पी नय्यर. या दोघानी संथ संगीताचा नूरच पार दूर भिरकावून दिला. रफीनी १९५२ नंतर आपली गायकी शैली बनण्यात ओपी नय्यर यांचा हात असल्याचे कबूल केले असे शम्मी साहेबानी एका मुलाखतीत सांगितले होते. ही शैली म्हणजे ''मेलोड्रामा'' शैली. या शैलीत प्रत्येक मूड हा थोड्या अतिरेकी प्रमाणात आणायचा असतो. रडणे हसणे, विस्पिरिंग, मृदुपणा, सारेच थोडे वाढवायचे. असा प्रकार मन्ना डे याना ही करता यायचा पण रफी यांच्या गायनात एकूण एक डझन आवाज लपलेले होते. त्यांच्या आवाजाचा पोत हा नायकाच्या पडद्यावरील रुपाचा ध्वनी माध्यमातील अविष्कार असे. रफी साहेब पुढे १९६९ पर्यंत आघाडीचे पुरूष गायक राहिले ते या दोन कारणाने.

या खेरीज, टांगेवाला असो खेळणीवाला असो, भिकारी असो सर्वांसाठी पार्श्व गायनाचे भन्नाट दुकान रफी यांच्या मालकीचे होते. रफी गरजू निर्माता गरजू संगीतकार असेल तर कित्येक वेळा या दुकानातील माल उदार हस्ते वाटीत. शम्मीकपूर, जॉनी वॉकर, दिलीप कुमार, राजेंद्रकुमार, यांचे वाटचालीत तर या आवाजाने किती हिस्सा उचलला याचा हिशेबच नाही. एका बाजूस मधुबनमे राधिका वा नाचे मन मोरा गाणारे रफी दुसऱ्या बाजूस बदनपे सितारे किंवा, अकेले अकेले हे गाणे म्हणूच कसे शकतात? एका बाजूस किसी की यादमे दुनियाके है भुलाये हुवे किंवा तेरी ऑखोंके सिवा चा गजला गाणारे रफी दिवाना मस्ताना किंवा यार चुलबुला है यासारखी नटखट गाणी कशी म्हणू शकतात याचे उत्तर कोठे मिळेल? ३१ जुलै १९८० रोजी मोठ्या हृदयविकाराच्या झटक्यानंतर मोहम्मद रफी यांचे रात्री १०.२५ वाजता निधन झाले. त्यावेळी ते फक्त ५५ वर्षाचे होते. भारतीय चित्रपटसृष्टीला शोकसागरात बूडवून हिंदी चित्रपट गायकीचा हा सम्राट अलविदा करून गेला. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**-email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)